



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com







# जिल्हा बँक निवडणुकीत शेतकरी विकास पॅनलचा दणदणीत विजय; २३ पैकी २१ जागांवर वर्चस्व

## कृष्णा आष्टीकर स्वतंत्र लढत जिंकले; नांदेडमधून संगिता पाटील यांचा विजय









**नांदेड (मनोहर कदम)**– नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय शेतकरी विकास पॅनलने दणदणीत यश मिळवत २३ पैकी २१ जागांवर विजय संपादन केला. यापैकी ११ जागा यापूर्वीच बिनविरोध निवडून आल्या होत्या, तर उर्वरित १२ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत शेतकरी विकास पॅनलने १० जागा जिंकल्या. हदगाव मतदारसंघातून खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचे पुत्र कृष्णा पाटील आष्टीकर यांनी स्वतंत्र उमेदवार म्हणून विजय मिळवला, तर हिमायतनगर मतदारसंघातून माजी आमदार माधवराव पाटील जळगावकर यांनी अवघ्या एका मताने विजय मिळवत निवडणुकीतील सर्वाधिक चुरशीची लढत जिंकली.

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी खासदार अशोकराव चव्हाण यांनी सर्वपक्षीय नेत्यांशी सातत्याने चर्चा करून प्रयत्न केले होते. त्या प्रयत्नांना यश मिळत २३ पैकी ११ जागा बिनविरोध निवडून आल्या. मात्र उर्वरित १२ जागांवर एकमत न झाल्याने मतदान घेण्यात आले. रविवार, दि. २६ जुलै रोजी जिल्ह्यातील १६ मतदान केंद्रांवर शांततेत मतदान झाले. मंगळवारी लेबर कॉलनी येथील ललित कला भवनात मतमोजणी झाल्यानंतर निकाल जाहीर करण्यात आला.

या निवडणुकीत अर्धापूर 'अ' मतदारसंघातून शेतकरी विकास पॅनलचे बी. आर. कदम यांनी ३० मते मिळवत विजय मिळविला. त्यांचे प्रतिस्पर्धी ज्ञानेश्वर बाबुराव राजेगोरे यांना केवळ चार मते मिळाली, तर एक मत अवैध ठरले. या विजयामुळे तब्बल दीड दशकांनंतर बी. आर. कदम यांचे जिल्हा बँकेत पुनरागमन झाले.

मुदखेड 'अ' मतदारसंघातून शेतकरी विकास पॅनलचे मारोती आनंदराव जाधव यांनी ३५ मते मिळवत एकतर्फी विजय मिळविला. त्यांचे प्रतिस्पर्धी मारोतराव पाटील व्यवहारे यांना केवळ एक मत मिळाले.

देगलूर 'अ' मतदारसंघात अत्यंत अटीतटीच्या लढतीत विद्यमान संचालक विजयसिंह बाळासाहेब देशमुख यांनी ४० मते मिळवत काँग्रेसच्या श्वेता बसवराज पाटील यांचा अवघ्या तीन मतांनी पराभव केला.

धर्माबाद 'अ' मतदारसंघातून शेतकरी विकास पॅनलचे दत्तात्रय लक्ष्मण रेड्डी यांनी २७ मते मिळवत विजय मिळविला. त्यांचे प्रतिस्पर्धी गोविंदराव जाधव यांना चार मते मिळाली. या विजयासाठी मराठवाडा जनहित पक्षासह स्थानिक नेतृत्वाने सक्रिय भूमिका बजावली.

भोकर मतदारसंघातून शेतकरी विकास पॅनलचे राजू गंगाधर जाधव यांनी ४७ मते मिळवत माधवराव कदम यांचा पराभव केला.

हदगाव मतदारसंघात खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचे वर्चस्व कायम राहिले. त्यांचे पुत्र कृष्णा पाटील आष्टीकर यांनी स्वतंत्र उमेदवार म्हणून निवडणूक लढवत तब्बल ६२ मते मिळवली, तर शेतकरी विकास पॅनलचे चंद्रशेखर कदम यांना केवळ आठ मते मिळाली.

माहूर मतदारसंघातून शेतकरी विकास पॅनलचे विद्यमान संचालक राजेंद्र नामदेवराव केशवे यांनी २० मते मिळवत शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे यांचा दोन मतांनी पराभव केला.

ओबीसी मतदारसंघातून अनिल पाटील बाभळीकर यांनी १, ०३१ मते मिळवत दणदणीत विजय मिळविला. त्यांचे प्रतिस्पर्धी ज्ञानेश्वर राजेगोरे यांना १६६, तर श्वेता पाटील यांना ६८ मते मिळाली. या मतदारसंघात १९ मते अवैध ठरली.

अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघातून रामचंद्र विठ्ठलराव मुसळे यांनी १,०६८ मते मिळवत विजय संपादन केला. प्रतिभा येरडलावार यांना १५४, तर विजय सोनवणे यांना ३३ मते मिळाली. २९ मते अवैध ठरली.

भटक्या विमुक्त जाती-जमाती मतदारसंघातून ज्ञानेश्वर ओमप्रकाश दहिफळे यांनी ९९० मते मिळवत उकंडराव मोहनसिंग जाधव यांचा पराभव केला.

या निवडणुकीत यापूर्वी मारोतराव कवळे, प्रणिता देवरे-चिखलीकर, आमदार भीमराव केराम, आमदार डॉ. तुषार राठोड, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, मीनल पाटील खतगावकर, श्रीनिवास चव्हाण, शिवराम लुटे, कैलास देशमुख गोरठेकर, सुशीलाबाई हणमंतराव पाटील बेटमोगरेकर आणि पुनम राजेश पवार हे ११ संचालक बिनविरोध निवडून आले होते.

या निवडणुकीत सर्वपक्षीय शेतकरी विकास पॅनलने जिल्हा बँकेवरील आपले वर्चस्व कायम राखले असून, जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील आगामी राजकीय समीकरणांवर या निकालाचा दूरगामी परिणाम होणार असल्याचे मानले जात आहे. मतमोजणी केंद्र परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

### माजी आ. जवळगावकर केवळ एका मताने विजयी

हिमायतनगर मतदारसंघात निवडणुकीतील काट्याची टक्कर पाहायला मिळाला. माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांना ११ तर त्यांचे प्रतिस्पर्धी विशाल राठोड यांना १० मते मिळाली.

### प्रतिष्ठेच्या लढाईत संगिता पाटील यांची सरशी

नांदेड 'अ' मतदारसंघातून संगिता विठ्ठल पाटील यांनी ३३ मते मिळवत विजय मिळविला. त्यांचे प्रतिस्पर्धी शेतकरी विकास पॅनलचे अतुल माधवराव वाघ यांना १२ मते मिळाली. या लढतीत माजी मंत्री डी. पी. सावंत यांनी वाघ यांच्या विजयासाठी प्रतिष्ठा पणाला लावली होती. मात्र संगिता पाटील यांच्या बाजूने झालेल्या मतदानामुळे त्यांना विजयाची संधी मिळाली.



### संवाद आणि समन्वयाचे यश –खा. अशोकराव चव्हाण

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत शेतकरी विकास पॅनलला मिळालेले घवघवीत यश हे सर्वपक्षीय संवाद आणि समन्वयाचे यश असल्याचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांनी म्हटले आहे. जिल्हा बँक निवडणुकीच्या निकालानंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना ते बोलत होते.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत शेतकरी विकास पॅनलचे ११ उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. त्यानंतर बारा जागांसाठी झालेल्या निवडणुकीच्या आजच्या मतमोजणीत शेतकरी विकास पॅनलने एकतर्फी वर्चस्व विजय संपादन केला. या निकालाबद्दल आनंद व्यक्त करताना खासदार अशोकराव चव्हाण म्हणाले की, जिल्हा बँकेसारख्या महत्त्वाच्या सहकारी संस्थेत राजकारण नको, या भूमिकेतून आम्ही सर्व राजकीय पक्षांशी संवाद साधून समन्वय घडवण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी झालेल्या वाटाघाटींना विविध पक्षातील नेत्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. चर्चेअंती सर्वसहमतीने उमेदवार निश्चित करण्यात आले. त्याचाच परिणाम म्हणून जिल्हा बँकेत शेतकरी विकास पॅनलला निर्णायक विजय मिळाला आहे. या यशामध्ये पॅनेलमधील सर्व नेते, पदाधिकारी व असंख्य कार्यकर्त्यांनी घेतलेल्या परिश्रमांचा मोठा वाटा असल्याचे ते पुढे म्हणाले.

### आता अध्यक्ष- उपाध्यक्ष निवडीकडे लक्ष

ही निवडणूक माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली लढवली गेली. त्यामुळे या विजयाकडे केवळ सहकार क्षेत्रातील यश म्हणून नव्हे, तर जिल्ह्यातील बदलत्या राजकीय समीकरणांच्या दृष्टीनेही पाहिले जात आहे. निकालानंतर आता बँकेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षपदाच्या निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सत्ता कोणत्या नेत्याच्या ताब्यात जाते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# देगलूरमध्ये सेवार्थ प्रणालीत खोटी नोंद करून ८९ लाख रूपयांचा घोटाळा; आरोग्य विभागातील ५ कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल

## बनावट देयके सादर करून शासकीय निधीचा अपहार; जिल्हा शल्यचिकित्सकांच्या तक्रारीवरून गुन्हा

**नांदेड (प्रल्हाद कांबळे)**– देगलूर ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षकासह ५ कर्मचाऱ्यांनी संगनमत करून सेवार्थ प्रणालीमध्ये खोटी नोंद करून बनावट देयके तयार केली. त्याद्वारे ८९ लाख ७० हजार १५० रुपयांचा शासकीय निधीचा अपहार केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणी देगलूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

डॉ. संजय माणिकराव पेरके (वय ४१) जिल्हा शल्य चिकित्सक, नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नरेश अंबादास देवणीकर वैद्यकीय अधीक्षक, देगलूर, रावसाहेब रामकिशनराव मोरे वरिष्ठ लिपीक, शिवाजी मारोती पवार प्रयोगशाळा सहायक, माधव किशन मगर अधिपरिचारिका, दिगंबर आनंदराव मोरे कनिष्ठ लिपीक सर्व राहणार देगलूर, ता. देगलूर या पाच जणांवर देगलूर ठाण्यात गु.र.नं. ३५९/२०२६ बीएनएस ३१६(५), ३१८(२), ३३६(२), ३३८, ३(५) घटनेचा कालावधी १४ जुलै २०२१ ते १५ जुलै २०२६ असा आहे.

आरोपींनी परस्पर संगनमत करून उपसंचालक आरोग्य सेवा, लातूर यांच्याकडे निधीची मागणी केली. त्यानंतर संवितरण पद्धतीने वेतनाची खोटी नोंद सेवार्थ प्रणालीत केली. यानंतर बनावट देयके तयार करून सहायक कोषागार कार्यालयात सादर केली.

या बनावट कागदपत्रांच्या आधारे एकूण ८९ लाख ७० हजार १५० रुपये रक्कम थेट कर्मचाऱ्यांच्या खात्यात वर्ग करून शासकीय रक्कमेचा अपहार करण्यात आला. सदर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सूर्यमोहन बोलमवाड करीत आहेत.

# नांदेड विभागाला मोठी भेट; परभणी-मुदखेड रेल्वे मार्गाच्या विद्युतीकरणासाठी १६३ कोटी मंजूर

## वंदे भारतसाठी सज्ज होणार परभणी–मुदखेड मार्ग; १६४ किमी ट्रॅकचे विद्युतीकरण होणार

**नांदेड (प्रतिनिधी)**– दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील परभणी–मुदखेड रेल्वे मार्गावर मोठी विकासकामे होणार आहेत. भारतीय रेल्वेने या मार्गावरील विद्युतीकरण प्रणाली उन्नतीकरणासाठी १६३ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे.

या प्रकल्पांतर्गत १६४ ट्रॅक किमी लांबीच्या संपूर्ण विभागात ट्रॅक्शन प्रणालीचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे.

सध्या या मार्गावरून जाणाऱ्या मालगाड्यांची संख्या आणि वजन मर्यादित आहे. नवीन विद्युतीकरण प्रणालीमुळे जास्त वजनाच्या आणि जास्त लांबीच्या मालगाड्या सहजपणे धावू शकतील. त्यामुळे या मार्गाची मालवाहतूक क्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार




आहे.

देशातील अत्याधुनिक वंदे भारत एक्स्प्रेस गाड्या या मार्गावरून धाववण्यासाठी हा अपग्रेड आवश्यक होता. उच्च क्षमतेची विद्युत प्रणाली असल्याने या मार्गावर भविष्यात वंदे भारतसह इतर वेगवान प्रवासी गाड्या देखील चालवता येणार आहेत.

जुन्या प्रणालीऐवजी नवीन अत्याधुनिक ट्रॅक्शन प्रणाली बसविल्याने गाड्यांचा सरासरी वेग वाढेल आणि वेळेची बचत होईल. तसेच ऊर्जा कार्यक्षमतेतही वाढ होणार आहे.

परभणी ते मुदखेड हा मार्ग दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. हा मार्ग महाराष्ट्र आणि तेलंगणाला जोडणारा दुवा आहे. या उन्नतीकरणामुळे नांदेड, प्रभणी, हिंगोली, नांदेड जिल्ह्यातील प्रवाशांना अधिक चांगल्या आणि वेगवान रेल्वे सेवा मिळणार आहेत.

रेल्वे प्रशासनाने सांगितले की, हे काम लवकरच सुरू करण्यात येऊन निर्धारित वेळेत पूर्ण केले जाणार आहे. यामुळे संपूर्ण मराठवाडा आणि विदर्भातील रेल्वे जोडणी अधिक मजबूत होईल.



# हळद उत्पादक शेतकऱ्यांचा एल्गार; लिलाव बंद पाडत मार्केट कमिटीवर धडक

## दरातील तफावत आणि ४५ दिवसांनी चुकारा; संतप्त हळद शेतकऱ्यांचा ठिय्या

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत हळद उत्पादक शेतकऱ्यांच्या संयमाचा बांध अखेर मंगळवारी फुटला आहे. हळदीच्या दरात होणारी प्रचंड तफावत, चुकारा मिळण्यास होणारा अवाजवी विलंब आणि मूलभूत सुविधांच्या कमतरतेमुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी थेट हळदीचे लिलाव बंद पाडून तीव्र ठिय्या आंदोलन पुकारले आहे.

शेकडो शेतकऱ्यांनी मार्केट कमिटी कार्यालयावर मोर्चा काढला. जोपर्यंत सभापती स्वतः येऊन चर्चा करत नाहीत आणि ठोस तोडगा काढत नाहीत, तोपर्यंत इथून हटणार नाही अशी ठाम भूमिका आंदोलकांनी घेतली आहे.



आंदोलक शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सध्या बाजारात हळदीच्या दरात ६ ते ७ हजार रुपयांची मोठी तफावत दिसून येत आहे. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. कष्टाने पिकवलेला माल विकल्यानंतरही चुकारा मिळण्यासाठी तब्बल ४५ दिवसांचा अवधी लागत असल्याची गंभीर तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे.

सर्वाधिक संतापाची बाब म्हणजे, शेतकऱ्याला घरगुती अडचण किंवा उपचारांसाठी तातडीने पैशांची गरज असल्यास, त्याला ३ टक्के 'बिल्टी कपात' करून पैसे दिले जात आहेत. हा थेट शेतकऱ्यांच्या मजबुरीचा फायदा घेत केलेला प्रकार असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

या सर्व प्रकाराला कंटाळून शेतकऱ्यांनी आज लिलाव प्रक्रिया बंद पाडली आणि कार्यालयासमोर ठिय्या मांडला. जोपर्यंत बाजार समितीचे सभापती आमच्याशी चर्चा करून या सर्व प्रश्नांवर कायमस्वरूपी तोडगा काढणार नाहीत, तोपर्यंत आम्ही एक इंचही मागे हटणार नाही असा सज्जड इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

सध्या बाजार समिती परिसरात तणावपूर्ण शांतता आहे. आता प्रशासन आणि सभापती यावर काय तोडगा काढतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे आणि शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

# परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)**– माथाडी व सुरक्षा रक्षक भरती प्रक्रिया कंम्प्युटर बेस्ड आयोजित ऑनलाईन परीक्षा होणार आहे. या परीक्षेच्या केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

बुधवार, दि. २९ ते गुरुवार ३० जुलै २०२७ पर्यत सकाळी ९ ते सायंकाळी ७ या कालावधीत ION DIGITAL ZONE IDZ एसएसएस इंदिरा इंन्स्टीटूट ऑफ टेक्नॉलॉजी विष्णुपूरी गेट नं. १८ २२ नांदेड तसेच श्री संभाजी कॉलेज ऑफ प्रायमरी शामल इज्युकेशनल कॅम्प देगाव रोड पोस्ट नांदला डिग्रस खडकुत या परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. या परीक्षा केंद्राच्या परिसरात बाहेरील व्यक्तीचा उपद्रव होऊ नये म्हणून तसेच सदर परीक्षा ही स्वच्छ सुसंगत वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने नांदेडचे पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये हा आदेश निर्गमित केला आहे.

या परीक्षा केंद्रापासून १०० मिटरच्या परिसरात २९ ते ३० जुलै २०२६ रोजी पर्यंत सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यतच्या कालावधीत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी याव्यक्तीरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. तसेच परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी, कर्मचारी याव्यतिरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कॅलक्युलेटर, ट्रॅन्झीस्टर, रेडिओ, लॅपटॉप इ. तत्सम साहित्य परीक्षा केंद्राच्या १०० मिटर पर्यंत परिसरात वापरण्यास, जवळ बाळगण्यास बंदी असणार आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# गुरू: अंधारातून प्रकाशाकडे नेणारे चिरंतन तत्त्व

भारतीय संस्कृतीत गुरू पौर्णिमेला अत्यंत पवित्र आणि प्रेरणादायी स्थान आहे. आषाढ पौर्णिमेला साजरी होणारी ही तिथी व्यास पौर्णिमा म्हणूनही ओळखली जाते. महर्षी वेदव्यासांनी वेदांचे विभाजन केले. महाभारतासारखा महान ग्रंथ रचला आणि पुराणांच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचे ज्ञान सामान्य जनतेपर्यंत पोहोचविले. म्हणूनच त्यांना आद्यगुरू मानले जाते. गुरु पौर्णिमा हा केवळ धार्मिक उत्सव नसून ज्ञान, संस्कार, विवेक आणि जीवनमूल्यांचा गौरव करणारा दिवस आहे. आजचे युग विज्ञान, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचे असले तरी गुरुचे महत्त्व किंचितही कमी झालेले नाही. उलट माहितीच्या महासागरात योग्य ज्ञानाची निवड करून जीवनाला योग्य दिशा देणारा मार्गदर्शक पूर्वीपेक्षा अधिक आवश्यक झाला आहे. ज्ञान मिळविण्यासाठी पुस्तके, इंटरनेट आणि आधुनिक साधने उपलब्ध आहेत; पण त्या ज्ञानाचा योग्य उपयोग कसा करायचा, हे शिकविणारा गुरुच असतो. गुरु म्हणजे केवळ अध्यात्म शिकविणारी व्यक्ती नव्हे. आई-वडील हे बालकाचे पहिले गुरु असतात. शिक्षक विद्यार्थ्याला शिक्षण देतात, प्रशिक्षक खेळाडूला घडवितात, संशोधन क्षेत्रात मार्गदर्शक वैज्ञानिक तयार करतात, तर उद्योगविश्वात अनुभवी व्यक्ती नवोदितांना यशाचा मार्ग दाखवतात. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर आणि प्रत्येक क्षेत्रात मार्गदर्शनाची गरज असते. योग्य गुरू मिळाला तर व्यक्तीची क्षमता खुलते; चुकीचे मार्गदर्शन मिळाले तर आयुष्य भरकटू शकते. आजच्या स्पर्धेच्या युगात तर गुरुची आवश्यकता अधिक प्रकर्षाने जाणवते. करिअरची निवड, कौशल्य विकास, व्यवसाय, कला, विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, शेती किंवा सामाजिक कार्य अशा प्रत्येक क्षेत्रात अनुभवी मार्गदर्शकाची अर्थात गुरुची साथ यशाचा पाया ठरते. त्यामुळे गुरु ही केवळ आध्यात्मिक संकल्पना नसून व्यावहारिक जीवनातील यशाचे महत्त्वाचे सूत्र आहे. देशाच्या प्रगतीलाही सक्षम गुरुंची आवश्यकता असते. राष्ट्र घडविण्याचे कार्य शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमधील शिक्षक करीत असतात. एक चांगला शिक्षक केवळ परीक्षार्थी तयार करत नाही, तर जबाबदार नागरिक घडवितो. प्रामाणिकपणा, वैज्ञानिक दृष्टिकोन, संविधानिक मूल्ये, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रप्रेम यांची बीजे विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षकच पेरतात. त्यामुळे शिक्षकांचा सन्मान म्हणजे देशाच्या भविष्याचा सन्मान होय. आज समाजात दिशाभूल, खोटी माहिती, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता आणि नैतिक मूल्यांची घसरण यांसारखी अनेक आव्हाने आहेत. अशा वेळी गुरू हा केवळ व्यक्ती नसून सत्य, विवेक आणि सदाचार यांचे प्रतीक बनतो. भारतीय तत्त्वज्ञानात गुरु म्हणजे अज्ञानाचा अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश देणारे तत्त्व मानले गेले आहे. म्हणूनच गुरु हा शब्द व्यक्तीपेक्षा अधिक व्यापक आहे. मात्र, गुरु निवडताना विवेकही तितकाच महत्त्वाचा आहे. समाजात अनेक ठिकाणी गुरुत्वाच्या नावाखाली अंधश्रद्धा, व्यक्तिपूजा आणि आर्थिक शोषणाची उदाहरणे दिसतात. त्यामुळे डोळे झाकून कोणाच्याही मागे न जाता सत्य, नैतिकता आणि मानवतेचा मार्ग दाखविणाऱ्या व्यक्तीलाच गुरु मानले पाहिजे. खरा गुरु अनुयायी निर्माण करत नाही; तो स्वतंत्र विचार करणारा, आत्मविश्वासू आणि जबाबदार माणूस घडवितो. याच संदर्भात भारतीय संतपरंपरेने अत्यंत महत्त्वाचा संदेश दिला आहे. संत ज्ञानेश्वर म्हणतात, 'मज हृदयी सद्गुरू। जेणे तारिलो हा संसारपूरू। म्हणोनि विशेष अत्यादरू विवेकावरी ।।' अर्थात हृदयातील विवेक हाच खरा सद्गुरू. बाह्य गुरु आपल्याला दिशा दाखवतो; परंतु योग्य-अयोग्याचा अंतिम निर्णय आपल्या अंतःकरणातील विवेकच घेत असतो. त्यामुळे बाह्य गुरुचे मार्गदर्शन आणि अंतर्मनातील सद्सद्विवेकबुद्धी यांचा समन्वय साधणारी व्यक्तीच खऱ्या अर्थाने यशस्वी आणि समाधानी जीवन जगू शकते. गुरु पौर्णिमेचा उत्सव हा केवळ पूजा-अर्चा किंवा परंपरा जपण्यापुरता मर्यादित राहू नये. या दिवशी आपल्या आयुष्याला दिशा देणाऱ्या आई-वडिलांप्रती, शिक्षकांप्रती, मार्गदर्शकांप्रती आणि समाजातील प्रेरणादायी व्यक्तींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा संकल्प केला पाहिजे. त्याचबरोबर स्वतःही आपल्या ज्ञानाचा, अनुभवाचा आणि संस्कारांचा लाभ इतरांना देण्याची तयारी ठेवली पाहिजे. ज्ञान, विवेक, संस्कार आणि योग्य मार्गदर्शन यांच्या बळावरच व्यक्ती, समाज आणि राष्ट्र प्रगत होऊ शकते. म्हणूनच गुरु पौर्णिमा आपल्याला एकच संदेश देते, जीवनाच्या प्रत्येक वाटेवर गुरुची गरज असते; परंतु त्या सर्व गुरुंपेक्षा श्रेष्ठ गुरु म्हणजे आपल्या अंतःकरणात जागृत असलेला विवेक. हाच विवेक आपल्याला अंधारातून प्रकाशाकडे, अज्ञानातून ज्ञानाकडे आणि स्वार्थातून समाजहिताकडे घेऊन जातो. अशा चिरंतन गुरु-तत्त्वाला वंदन करणे, हाच गुरु पौर्णिमेचा खरा सार आहे.

# गुरुपौर्णिमा: ज्ञान, संस्कार आणि प्रेरणेचा महोत्सव



गुरु म्हणजे अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेणारा दीपस्तंभ. भारतीय संस्कृतीत गुरुंना देवतुल्य स्थान दिले गेले आहे. गुरुंच्या ज्ञान, संस्कार आणि मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी आषाढ महिन्यातील पौर्णिमेला गुरुपौर्णिमा हा पवित्र सण मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने साजरा केला जातो. हा दिवस महर्षी वेदव्यास यांच्या स्मरणार्थ 'व्यास पौर्णिमा' म्हणूनही ओळखला जातो. वेदांचे संकलन, महाभारताची निर्मिती आणि भारतीय ज्ञानपरंपरेला दिलेल्या अमूल्य योगदानामुळे त्यांना आदिगुरू मानले जाते.

गुरुपौर्णिमा हा केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक उत्सव नसून ज्ञानाचा गौरव, संस्कारांचा सन्मान आणि प्रेरणेचा महोत्सव आहे. या दिवशी विद्यार्थी आपल्या गुरुंप्रती आदर, श्रद्धा आणि कृतज्ञता व्यक्त करतात. तसेच त्यांच्या शिकवणीचे पालन करण्याचा संकल्प करतात. गुरुंच्या मार्गदर्शनामुळेच व्यक्तीचे चारित्र्य घडते, विचार समृद्ध होतात आणि जीवनाला योग्य दिशा मिळते.

ज्ञान, मूल्ये आणि संस्कार यांचा वारसा जपणारी गुरुपौर्णिमा ही भारतीय संस्कृतीची एक प्रेरणादायी आणि चिरंतन परंपरा आहे. भारतीय संस्कृतीत गुरुंना अत्यंत पूजनीय स्थान दिले गेले आहे. गुरु ब्रह्मा, गुरु विष्णू, गुरु देवो महेश्वरः या वचनातून गुरुंचे श्रेष्ठत्व स्पष्ट होते. गुरु हे केवळ ज्ञान देणारे नसून विद्यार्थ्याला योग्य दिशा, संस्कार आणि जीवनमूल्ये देणारे मार्गदर्शक असतात. गुरु विद्यार्थ्यांमध्ये प्रामाणिकपणा, शिस्त, आत्मविश्वास, कर्तव्यनिष्ठा आणि सामाजिक जबाबदारी यांसारखे गुण विकसित करतात. ते विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना ओळखून त्यांना यशाच्या मार्गावर जाण्यास प्रेरणा देतात.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातही गुरुंचे महत्त्व कायम आहे. ते केवळ माहिती देत नाहीत, तर त्या ज्ञानाचा योग्य उपयोग कसा करावा हे शिकवतात. म्हणूनच गुरु हे विद्यार्थ्यांच्या जीवनाचे प्रेरणास्थान आणि यशाचे खरे शिल्पकार आहेत. गुरुंच्या शिकवणीचा आदर करून ती जीवनात आचरणात आणणे हीच गुरुंप्रती खरी कृतज्ञता आहे. भारतीय ज्ञानपरंपरेचे अमूल्य शिल्पकार म्हणजे महर्षी वेदव्यास. त्यांनी आपल्या महान विद्वत्तेने आणि दूरदृष्टीने भारतीय संस्कृतीला ज्ञानाचा समृद्ध वारसा दिला.

महर्षी वेदव्यास यांनी वेदांचे संकलन करून त्यांचे योग्य विभागीकरण केले, त्यामुळे वेदांचे ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली. त्यांनी महाभारत, ब्रह्मसूत्रे तसेच अनेक पुराणांची निर्मिती करून भारतीय साहित्य, तत्त्वज्ञान आणि अध्यात्म क्षेत्रात अतुलनीय योगदान दिले. त्यांच्या ग्रंथांमधून धर्म, नीती, कर्तव्य, जीवनमूल्ये आणि मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान यांचे मार्गदर्शन मिळते. भारतीय ज्ञानपरंपरेचे जतन, संवर्धन आणि प्रसार करण्यामध्ये त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. महर्षी वेदव्यास यांच्या या महान कार्यामुळे त्यांना आदिगुरु म्हणून सन्मान दिला जातो आणि त्यांच्या स्मरणार्थ गुरुपौर्णिमा हा पवित्र दिवस साजरा केला जातो.

गुरुपौर्णिमा हा गुरु-शिष्य परंपरेचा गौरव करणारा पवित्र दिवस आहे. या दिवशी शाळा, महाविद्यालये आणि विविध शैक्षणिक संस्थांमध्ये विशेष कार्यक्रमांचे आयोजन करून गुरुंच्याप्रती आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली जाते. गुरुपौर्णिमेच्या दिवशी शिक्षकांचा सन्मान करून त्यांना शुभेच्छा दिल्या जातात. विद्यार्थी आपल्या शिक्षकांबद्दल मनोगते व्यक्त करून त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल आभार मानतात. या प्रसंगी भाषणे, कविता, गीते, नाटिका आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले जातात. अनेक ठिकाणी महर्षी वेदव्यास यांच्या प्रतिमेचे पूजन करून ज्ञान आणि शिक्षणाच्या परंपरेचा सन्मान केला जातो. गुरुंच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या शिकवणीचे जीवनात पालन करण्याचा संकल्प केला जातो.

आजच्या काळात गुरुपौर्णिमेचे स्वरूप अधिक व्यापक झाले आहे. या दिवशी काही संस्था वृक्षारोपण, रक्तदान, ग्रंथदान, स्वच्छता अभियान आणि इतर समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करतात. अशा उपक्रमांमधून गुरुंनी दिलेल्या सेवा, संस्कार आणि मानवतेच्या मूल्यांचा संदेश समाजापर्यंत पोहोचवला जातो. अशाप्रकारे गुरुपौर्णिमा हा केवळ गुरुंचा सन्मान करण्याचा दिवस नसून ज्ञान, संस्कार, सेवा आणि सामाजिक बांधिलकीचा उत्सव म्हणून साजरा केला जातो.

गुरुपौर्णिमा हा विद्यार्थ्यांसाठी गुरुंच्या मार्गदर्शनाचे महत्त्व समजून घेण्याचा आणि त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा विशेष दिवस आहे. या दिवसामुळे विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षकांविषयी आदर, श्रद्धा आणि कृतज्ञतेची भावना अधिक दृढ होते. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व आणि ज्ञानाचा योग्य उपयोग याची जाणीव होते. शिक्षणाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होतो आणि नवीन गोष्टी शिकण्याची प्रेरणा मिळते. गुरुंच्या विचारांमधून आणि मार्गदर्शनातून विद्यार्थी शिस्त, प्रामाणिकपणा, मेहनत, संयम आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व समजून घेतात.

गुरु विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमता ओळखण्यास मदत करतात आणि जीवनात योग्य ध्येय निश्चित करण्यासाठी प्रेरणा देतात. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, जबाबदारीची भावना आणि यश मिळविण्याची जिद्द निर्माण होते. अशाप्रकारे, गुरुपौर्णिमा हा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रेरणादायी ठरणारा दिवस आहे. हा दिवस त्यांना गुरुंच्या ज्ञानाचा आणि संस्कारांचा आदर करून जीवनात पुढे जाण्याची प्रेरणा देतो. गुरुपौर्णिमा हा केवळ गुरुंचा सन्मान करण्याचा दिवस नसून समाजाला ज्ञान, संस्कार आणि मानवतेचा संदेश देणारा प्रेरणादायी उत्सव आहे. ज्ञान हेच खरे सामर्थ्य आहे याची जाणीव गुरुपौर्णिमा करून देते. ज्ञानाच्या माध्यमातून व्यक्तीचा तसेच समाजाचा विकास घडतो. हा पवित्र दिवस आपल्याला गुरु-शिष्य परंपरेचे जतन आणि संवर्धन करण्याची प्रेरणा देतो. गुरुंच्या मार्गदर्शनामुळे समाजात चांगले विचार, नैतिक मूल्ये आणि सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होतो. गुरुपौर्णिमेमुळे समाजात आदर, संस्कार, शिस्त आणि सद्भावना वाढीस लागतात. आपल्या जीवनात मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा, पालकांचा आणि प्रत्येक प्रेरणादायी व्यक्तीचा सन्मान केला पाहिजे, हा महत्त्वपूर्ण संदेश हा दिवस देतो. अशाप्रकारे, गुरुपौर्णिमा हा ज्ञानाचा आदर, संस्कारांची जपणूक आणि मानवतेची भावना वृद्धिंगत करणारा सामाजिक उत्सव आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षणाची साधने आणि पद्धती बदलल्या असल्या तरी शिक्षकांचे मार्गदर्शन आणि महत्त्व आजही तितकेच कायम आहे. इंटरनेट आणि डिजिटल माध्यमांमधून माहिती सहज उपलब्ध होत असली, तरी त्या ज्ञानाचा योग्य उपयोग कसा करावा, योग्य निर्णय कसे घ्यावेत आणि जीवनात योग्य मार्ग कसा निवडावा हे गुरुच शिकवतात. आजच्या काळात शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये विचारशक्ती, सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि जबाबदारीची भावना विकसित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. ते विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेत यश मिळविण्यासाठी तयार करत नाहीत, तर जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम बनवतात. चांगला गुरू विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून त्याला ज्ञानासोबतच संस्कार, नैतिक मूल्ये आणि मानवी संवेदनांची जाणीव करून देतो. त्यामुळे विद्यार्थी एक उत्तम व्यक्ती आणि जबाबदार नागरिक बनतो. म्हणूनच ज्ञान, संस्कार आणि मानवी मूल्यांचा समतोल राखण्यासाठी गुरुपौर्णिमेचे महत्त्व आजच्या आधुनिक काळातही तितकेच प्रेरणादायी आणि आवश्यक आहे. गुरुपौर्णिमा हा केवळ एक सण नसून ज्ञान, संस्कार, कृतज्ञता आणि प्रेरणेचा पवित्र उत्सव आहे. गुरुंच्या मार्गदर्शनामुळे व्यक्तीच्या विचारांना योग्य दिशा मिळते, व्यक्तिमत्त्व घडते आणि जीवन अधिक समृद्ध बनते. गुरुंचे ज्ञान, अनुभव आणि संस्कार हे व्यक्ती, समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे असतात. म्हणूनच या दिवशी प्रत्येकाने आपल्या गुरुंप्रती आदर आणि कृतज्ञता व्यक्त करून त्यांच्या शिकवणीचा जीवनात अवलंब करण्याचा संकल्प करावा. गुरुंच्या ज्ञानरूपी प्रकाशामुळे व्यक्ती अज्ञानातून ज्ञानाकडे, अंधारातून यशाच्या मार्गाकडे वाटचाल करते. त्यामुळे गुरु हे जीवनातील खरे मार्गदर्शक असून त्यांच्या प्रेरणेनेच व्यक्तीचे जीवन यशस्वी, समृद्ध आणि मूल्यवान बनते.

**-डॉ.आरती राणे**
नांदेड
मो.नं.९७६७८३०४९८

# आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन

आजचा दिवस म्हणजे २९ जुलै हा दिवस संपूर्ण जगात आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन म्हणून साजरा केला जातो. जागतिक स्तरावर वाघांचे संरक्षण आणि संवर्धन व्हावे म्हणून सेंट पिटरर्सबर्ग येथे झालेल्या व्याघ्र परिषदेत २९ जुलै हा दिवस जागतिक व्याघ्र दिन म्हणून घोषित करण्यात यावा असा ठराव मांडण्यात आला त्याला सर्व देशांनी अनुमोदन दिल्याने हा दिवस जागतिक स्तरावर आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन म्हणून साजरा केला जातो. वाघ हा जंगलाचा राजा आहे. जंगलातील त्याची निर्धास्त चाल गगनभेदी डरकाळी या त्याच्या गुण वैशिष्ट्यामुळे वाघ हा सर्वांना आकर्षित करणारा प्राणी आहे. जगभरात कोणत्याही अभयारण्यात, जंगलातील सफरीवर गेलेल्या पर्यटकांचे पहिले आकर्षण वाघ दिसण्याचे असते. भारतीय संस्कृतीत तर वाघाला आदरयुक्त भीतीचे स्थान आहे.

वाघाला जंगलाचा राजा असे संबोधले जाते. वाघ हा भारताचा राष्ट्रीय प्राणी असून जनमानसात शौर्य, राजबिंडेपणा, सौंदर्याचे, राकटतेचे प्रतीक आहे म्हणूनच हिंदू संस्कृतीत वाघ पार्वतीचा अवतार असलेली देवी महिषासुरमर्दिनीचे व तिच्या अनेक रूपांचे वाहन बनले आहे. वाघ आणि आदिवासी जमातींचा हजारो वर्षाचा संबंध आहे. आदिवासी



जमातीत वाघाला देव मानतात. वाघांचा कोप होऊ नये म्हणून ते वाघाला देव मानून त्याची पूजा करतात. वाघांच्या अनेक जाती आहेत. भारतातील पट्टेरी वाघ जगातील वैशिष्ट्यपूर्ण प्राण्यांपैकी एक मानला जातो. भारत हे वाघांचे माहेरघर मानले जाते.

भारताप्रमाणेच आशिया व आफ्रिका खंडातील इतर देशातही वाघांचे अस्तित्व आढळते. पूर्वी वाघांची संख्या खूप होती परंतु मधल्या काळात वाघांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली. केवळ भारतातच नाही तर जगभरात वाघांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले. खेळ, मनोरंजन आणि वाढत्या लोकसंख्येमुळे वाघांच्या आधीवासावर होणारे मानवी अतिक्रमण तसेच वाघांच्या अवयवांची तस्करी करण्यासाठी केली जाणारी शिकार यामुळे दिवसेंदिवस वाघांचे प्रमाण कमी होऊ लागले. वाघांचे प्रमाण इतके कमी झाले की एकेदिवशी वाघांची डरकाळी लुप्त होईल की काय अशी भीती निर्माण झाली. ही भीती अनाठायी नाही. कारण गेल्या काही वर्षात वाघांच्या शिकारीच्या अनेक घटना आपल्या देशात घडल्या आहेत.

चार वर्षांपूर्वी झालेल्या अवनी वाघिणीची शिकार कोण विसरेल? अवनी वाघिणीची शिकार झाल्यावर संपूर्ण देश हळहळला होता. अवनी प्रमाणेच गोव्यातही दोन वाघिणींची शिकार करण्यात आली होती. मागील चार वर्षात अनेक वाघांचे मृतदेह वनविभागाला आढळून आले आहेत. वाघ कमी होणे ही धोकादायक बाब आहे कारण जंगलात वाघ असणे हे समृद्ध जंगलाचे लक्षण समजले जाते. जंगलात असलेल्या अन्न साखळीत वाघ हा प्रमुख घटक समजला जातो. वाघांमुळे जंगलातील तृणभक्षी प्राणी व वनस्पती यांच्यात समतोल राखला जातो. वाघ नसतील तर जंगलात तृणभक्षी प्राण्यांची संख्या अमर्याद वाढेल व इतर निसर्गसंपदेवर या गोष्टीचा ताण पडेल परिणामी निसर्गचक्रच बिघडून जाईल. वाघ जंगलात असणे हे जंगलाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

वाघ असलेल्या जंगलात साधे लाकडूतोड करणारे व जंगलावर अवलंबून असणारव लोक भीतीपोटी जंगलात जात नाही त्यामुळे जंगलेही सुरक्षित राहतात. वाघ नाहीसे झाले की जंगलही नाहीसे होतील आणि जंगले नाहीसे झाल्यास निसर्गचक्रच बिघडून जाईल आणि त्याचे दुष्परिणाम केवळ मानवजातीलाच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीला भोगावे लागतील. तसे होऊ द्यायचे नसेल तर वाघांचे अस्तित्व टिकवले पाहिजे. आज या आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने वाघांचे अस्तित्व टिकवण्यासाठी प्रयत्न करण्याची शपथ घ्यायला हवी.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि, पुणे
मो. ९९२२५४६२९५

# गुरुपौर्णिमेनिमित्त गुरूंना कृतज्ञतेचे शब्द



गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः।।

गुरू हा कुंभाराप्रमाणे असतो. जसा कुंभार मातीला योग्य आकार देऊन सुंदर मडके घडवतो, तसाच गुरू आपल्या शिष्याच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देतो. तो केवळ पुस्तकातील धडे शिकवत नाही, तर जीवन कसे जगावे, संकटांना कसे सामोरे जावे, माणुसकी कशी जपावी आणि समाजात एक चांगला माणूस म्हणून कसे उभे राहावे हेही शिकवतो. माझ्या आयुष्यात हे स्थान लाभले ते माझे वंदनीय व्यंकटेश चौधरी सर यांच्या रूपाने.

माझा शाळेचा पहिला दिवस आणि सरांचा जि. प. शाळा, बारड येथील या पहिल्याच दिवशी आमची पहिली भेट झाली. त्या वेळी मी एक निरागस, अबोल विद्यार्थी होतो. पण सरांनी मला केवळ विद्यार्थी म्हणून पाहिले नाही; त्यांनी मला आपल्या मुलाप्रमाणे जपले. शाळेत येताना अनेकदा आम्ही दोघेही जवळजवळ एकाच वेळी शाळेच्या गेटवर पोहोचत असू. कधी सर माझी वाट पाहत उभे राहत, तर कधी मी त्यांच्या येण्याची आतुरतेने वाट पाहत असे. त्या क्षणांत शिक्षक आणि विद्यार्थी यांचे नाते केव्हाच मैत्रीत रूपांतर झाले होते. सरांनी माझ्या अभ्यासाबरोबरच माझ्या व्यक्तिमत्त्वाकडे विशेष लक्ष दिले. माझे अक्षर सुधारले, शुद्धलेखन सुधारले, वाचनाची आवड निर्माण केली आणि मला अनेक उत्तम पुस्तके वाचायला दिली. भाषण स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, विविध उपक्रम यांत सहभागी होण्याची प्रेरणा त्यांनीच दिली. माझ्या आत्मविश्वासाचा पाया त्यांनीच रचला.

आजही मला एक प्रसंग स्पष्ट आठवतो. सर काही दिवस रजेवर असले की मी शाळेत जाण्यास टाळाटाळ करत असे. कारण माझ्यासाठी शाळा म्हणजे सर, आणि सर म्हणजे शाळा. माझ्या आईने याबाबत सरांना पत्र लिहिले. त्यावर सरांनी दिलेले उत्तर आजही माझ्यासाठी अमूल्य ठेवा आहे. त्या पत्रात त्यांनी माझ्याविषयी व्यक्त केलेले प्रेम, विश्वास आणि कौतुक हे माझ्या आयुष्यातील सर्वात मोठे पारितोषिक आहे. काळ पुढे सरकत गेला. सरांची बदली झाली, माझी शाळा बदलली आणि जीवनाच्या वाटा वेगळ्या झाल्या. पण गुरू-शिष्याचे नाते मात्र कधीच दूर झाले नाही. जवळपास पंधरा वर्षांनंतर पुन्हा भेट झाली, तेव्हा सरांनी मला महात्रया रा. यांचे The Unposted Letter हे पुस्तक भेट दिले. त्या भेटीत मला जाणवले की काळ बदलतो, परिस्थिती बदलते; पण गुरूंचे प्रेम आणि आशीर्वाद कधीच बदलत नाहीत.

आजही गुरुपौर्णिमा, शिक्षक दिन किंवा सरांचा वाढदिवस, या प्रत्येक दिवशी त्यांना शुभेच्छा दिल्याशिवाय माझा दिवस सुरू होत नाही. कारण माझ्या आयुष्यातील प्रत्येक यशामागे माझ्या आई-वडिलांइतकाच माझ्या गुरूंचा वाटा आहे.

आज गुरुपौर्णिमेच्या या पवित्र दिवशी मी माझ्या वंदनीय गुरूंना मनःपूर्वक प्रणाम करतो.

सर, तुम्ही मला केवळ अक्षरज्ञान दिले नाही तर चांगला माणूस होण्याची शिकवण दिली. माझ्यावर ठेवलेला विश्वास, केलेले प्रेम, दिलेली प्रेरणा आणि आयुष्यभरासाठी दिलेले संस्कार हे माझे सर्वात मोठे धन आहे. तुमचे ऋण मी कधीच फेडू शकणार नाही. पण तुमच्या शिकवणीनुसार प्रामाणिक, कर्तव्यदक्ष आणि माणुसकी जपणारा माणूस म्हणून जगण्याचा प्रयत्न करीन, हीच तुमच्या चरणी खरी गुरुदक्षिणा असेल.

गुरुपौर्णिमेच्या या मंगलमय प्रसंगी माझ्या वंदनीय गुरुवर्य व्यंकटेश चौधरी सरांना साष्टांग दंडवत आणि मनःपूर्वक कृतज्ञ प्रणाम! गुरूंचे ऋण शब्दांत व्यक्त होत नाही; ते फक्त आयुष्यभर कृतज्ञतेने जगूनच फेडता येते.

गुरू...ज्यांनी माझ्या आयुष्याला अर्थ दिला! गुरुपौर्णिमेनिमित्त माझ्या वंदनीय गुरुवर्य व्यंकटेश चौधरी सरांना कृतज्ञतापूर्वक नमन. आईने मला जन्म दिला... पण जगण्याचा अर्थ माझ्या गुरूंनी शिकवला. कोणालाच कल्पना नव्हती की हा प्रवास पुढे गुरू-शिष्याच्या अतूट नात्याचा इतिहास बनणार आहे. सरांनी माझा इयत्ता पहिली (ब) मध्ये प्रवेश घेतला. पहिल्या काही दिवसांत मी त्यांच्यासाठी एक सामान्य विद्यार्थी होतो; पण काही दिवसांतच त्यांनी माझ्यातील विद्यार्थी नव्हे, तर माणूस ओळखला. शाळेची वेळ सकाळी सातची. मी रोज वेळेवर शाळेत पोहोचत असे. सरही नांदेडहून प्रवास करून वेळेवर येत. हळूहळू एक सुंदर सवय तयार झाली. कधी सर आधी आले तर ते शाळेच्या गेटवर माझी वाट पाहत उभे राहत. आणि कधी मी आधी पोहोचलो तर मी गेटवर उभा राहून सरांच्या येण्याची वाट पाहत असे.

तो क्षण आजही डोळ्यांसमोर जिवंत आहे. त्या वेळी मला कळले नव्हते की ही वाट पाहणे म्हणजे केवळ उपस्थिती नव्हती...

ते प्रेम होते...ती आपुलकी होती...

तो विश्वास होता...आणि एका गुरूने आपल्या विद्यार्थ्यावर केलेले निरागस प्रेम होते. हळूहळू आमचे नाते शिक्षक आणि विद्यार्थी या चौकटीत राहिले नाही. सरांनी कधी माझी चौकशी केली की डबा खाल्लास का?

कधी माझे अक्षर सुधारले.

कधी शुद्धलेखनावर मेहनत घेतली.

कधी पुस्तक हातात देत म्हणाले...

हे वाच...पुस्तक माणसाला मोठं बनवतं. आज मला पुस्तकांची आवड असेल, विचार करण्याची सवय असेल, व्यासपीठावर उभे राहून बोलण्याचे धाडस असेल, तर त्या प्रत्येक गोष्टीच्या मुळाशी एकच नाव आहे...व्यंकटेश चौधरी सर. सरांनी मला केवळ अभ्यास शिकवला नाही...तर आयुष्य वाचायला शिकवले. त्यांनी अक्षर शिकवले नाही... तर विचार शिकवले. पुस्तके दिली नाहीत...तर स्वप्ने दिली.

आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे...

एका सामान्य विद्यार्थ्यामध्ये असामान्य होण्याचा आत्मविश्वास जागवला. आजही जेव्हा मागे वळून पाहतो तेव्हा वाटते. माझ्या आयुष्याच्या पुस्तकातील सर्वात सुंदर प्रकरण जर कोणते असेल, तर ते माझ्या गुरूंच्या सहवासाचेच आहे....माझ्या आयुष्यातील सर्वात हळवा प्रसंग आजही आठवला की मन नकळत भूतकाळात हरवून जाते. त्या वेळी मी इयत्ता पहिलीत शिकत होतो. वय लहान होते, पण मन मात्र गुरूंशी इतके जोडले गेले होते की, सर शाळेत नसतील तर शाळाच अपुरी वाटायची. कधी कौटुंबिक कारणांमुळे, तर कधी शाळेच्या कामानिमित्त सरांना रजा घ्यावी लागायची. त्या दिवशी आमच्या वर्गातील मुलांना दुसऱ्या वर्गात बसवले जायचे. त्या वर्गातील शिक्षकही त्यांच्या परीने शिकवत होते; पण माझ्या बालमनाला माझे गुरुच हवे होते. माझ्यासाठी त्या वयात शाळा म्हणजे चौधरी सर... आणि चौधरी सर म्हणजेच शाळा. सर रजेवर असले की मी शाळेत जाण्याचाच हट्ट सोडून द्यायचो. आई कितीही समजावून सांगायची, तरी माझे मन तयार होत नसे. एका लहानशा मुलाच्या मनात गुरूंविषयी निर्माण झालेला तो जिव्हाळा शब्दांत मांडणे आजही कठीण वाटते.

ही गोष्ट आईच्या लक्षात आली. तिने सरांना एक पत्र लिहिले. त्या पत्रात एक आईची काळजी होती. आपल्या मुलाचे शाळेवरील प्रेम कमी झाले नव्हते; उलट ते एका गुरूवर इतके केंद्रित झाले होते की, गुरू नसतील तर शाळेत जाण्यालाच अर्थ उरत नव्हता. आईचे ते पत्र वाचून सरांनी जे उत्तर दिले, ते आजही माझ्यासाठी एखाद्या अमूल्य ठेव्यापेक्षा कमी नाही. त्या पत्रात त्यांनी त्यांच्या रजेचे कारण शांतपणे सांगितले. पण त्याहून अधिक महत्त्वाचे म्हणजे त्यांनी माझ्याबद्दल लिहिलेला विश्वास.

अवधूत हा अतिशय गोड मुलगा आहे. दिलेले काम तो नेहमी वेळेवर पूर्ण करतो. तो मला खूप आवडतो. ही काही साधी वाक्ये नव्हती. तो माझ्या आयुष्याचा पहिला सन्मान होता. एका शिक्षकाने आपल्या विद्यार्थ्यावर व्यक्त केलेला विश्वास होता. एका गुरूने आपल्या शिष्याच्या पाठीवर ठेवलेला प्रेमाचा हात होता.

आज अनेक पुरस्कार, प्रमाणपत्रे आणि सन्मान मिळाले; पण त्या एका पत्रातील काही ओळींनी दिलेला आनंद आणि आत्मविश्वास आजपर्यंत कोणत्याही पुरस्काराने दिलेला नाही. माणसाच्या आयुष्यात काही गोष्टींची किंमत पैशांनी मोजता येत नाही. आईचे ममत्व...वडिलांचे कष्ट...आणि गुरूंचा विश्वास... ही तीन संपत्ती लाभली, तर माणूस आयुष्यात कधीच गरीब राहत नाही. चौधरी सरांनी माझ्यावर केलेला विश्वास हा माझ्या व्यक्तिमत्त्वाचा पाया बनला. शाळेत एखादी चित्रकला स्पर्धा असो, भाषण स्पर्धा असो, निबंध लेखन असो किंवा राष्ट्रीय सणांचा कार्यक्रमसर माझे नाव नेहमी आवर्जून पुढे करायचे. ते म्हणायचे, व्यक्त होणारा विद्यार्थीच पुढे मोठा होतो.

आज मी मंचावर उभा राहून न घाबरता बोलू शकतो, विचार मांडू शकतो, लेख लिहू शकतो, कारण माझ्या हातात पहिल्यांदा आत्मविश्वासाची लेखणी देणारे माझे गुरूच होते. त्यांनी आम्हाला केवळ पाठ्यपुस्तक शिकवले नाही. त्यांनी आम्हाला संविधानाचा आदर शिकवला. स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व शिकवले. महापुरुषांचे विचार समजावून सांगितले. पुस्तकांवर प्रेम करायला शिकवले, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे... चांगला विद्यार्थी होण्यापेक्षा आधी चांगला माणूस व्हायला शिकवले. आज समाजात अनेक यशस्वी लोक दिसतात. पण प्रत्येक यशस्वी व्यक्तीच्या मागे शांतपणे उभा असलेला एखादा गुरु असतो. त्याचे नाव कदाचित जगाला माहीत नसते...पण त्या विद्यार्थ्याच्या प्रत्येक यशामध्ये त्याचा वाटा असतो.

माझ्या प्रत्येक यशाच्या मागेही एक शांत, साधा, प्रेमळ आणि संस्कारांनी समृद्ध असा चेहरा उभा आहे...तो म्हणजे... माझे वंदनीय गुरुवर्य व्यंकटेश चौधरी सर.

**-अवधूत देशमुख**
पाटनूर, ता. अर्धापूर, जि. नांदेड

# महानगरपालिका अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या गुणवंत पाल्यांचा गौरव सोहळा उत्साहात

## महापौर, आयुक्त व इतर मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सन्मान

**नांदेड (प्रतिनिधी)–** महानगर-पालिका प्रशासनाच्यावतीने पालिका सेवेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या इयत्ता १० वी आणि १२ वीच्या परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळवून घवघवीत यश संपादन केलेल्या गुणवंत पाल्यांचा सत्कार सोहळा दि. २७ जुलै रोजी महापालिकेत कै. शंकरराव चव्हाण सभागृह येथे पार पडला. यंदा या सोहळ्याचे हे तिसरे वर्षे होते. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून महापौर कविता मुळे तर प्रमुख अतिथी म्हणून मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, उपमहापौर दीपकसिंह रावत, सभागृह नेते महेश कनकदंडे, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, महिला बाल कल्याण सभापती सदिच्छा सोनी पाटील, माजी सभापती किशोर स्वामी, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त व इतर विभाग प्रमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

मागील तीन वर्षापासून महापालिकेचा वार्षिक अर्थसंकल्प सादर करताना महापालिकेतील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या पाल्यांना शिक्षणाच्या दृष्टिकोनातून प्रोत्साहित करण्यासाठी गुणवंत पाल्यांच्या सत्कारासाठी विशेष तरतुद करण्यात येत आहे. सदरील तरतुदीनुसार या वर्षी सुध्दा इयत्ता दहावी व बारावीमध्ये ७५% पेक्षा विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या गुणवंत पाल्यास इयत्ता दहावीतील १८ विद्यार्थांना प्रत्येकी ११ हजार व इयत्ता बारावीतील ४ गुणवंत पाल्यांना प्रत्येकी रु.२१ हजारांचा धनादेश, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

दहावी व बारावीचे विद्यार्थी पालकांसह या कार्यक्रमास उपस्थित झाले होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मान्यवरांनी त्यांच्या भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या मुलांनी कठोर परिश्रम करुन यश प्राप्त केले आहे. मात्र खरी परीक्षा पुढे आहे. परीक्षेत गुण मिळणे महत्वाचे आहे. पण त्यापेक्षा या गुणांचा जीवनाच्या वाटचालीत कसा उपयोग करता हे त्यापेक्षा महत्वाचे आहे. त्यामुळे मुलांनी पुढच्या वाटचालीसाठी तयार राहावे, असे आवाहन मान्यवरांनी केले.

याप्रसंगी अध्यक्षीय भाषणात बोलताना महापौर सौ. कविता संतोष मुळे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे मनापासून कौतुक केले. आपल्या मनोगतात त्या म्हणाल्या की, महानगरपालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी अहोरात्र शहराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या सेवेसाठी झटत असतात. कामाचा प्रचंड ताण आणि व्यस्त दिनक्रम असूनही त्यांनी आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होऊ दिले नाही, ही अत्यंत भूषणावह बाब आहे. आज या मुलांनी मिळवलेले यश हे केवळ त्यांच्या कुटुंबाचे नसून संपूर्ण महानगरपालिका परिवाराचा अभिमान आहे.

तसेच या प्रसंगी बोलताना मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे जाहीर कौतुक केले. ते म्हणाले, या उपक्रमातून महापालिकेतील अतिरिक्त आयुक्त ते चतुर्थश्रेणी कर्मचारी यांच्या पाल्यांना एकसमान सन्मान देण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. मनपा अधिकारी व कर्मचारी यांच्या पाल्यांना शिक्षणाच्या दृष्टिकोनातून प्रोत्साहन मिळावे व या सत्कार सोहळ्यापासून प्रेरणा घेऊन त्यांनी आपल्या जीवनामध्ये उंच भरारी घ्यावी. तसेच समाजामध्ये वावरत असताना एक सुजाण नागरिक होऊन आपली स्वतःची कारकीर्द घडवण्याबरोबरच उच्चपदस्थ जाऊन या संस्थेचे त्याचबरोबर आपल्या आई-वडिलांचे नावलौकिक करावे, असे आवाहन गुणवंतांना यावेळी आयुक्तांनी केले.

त्याचप्रमाणे उपमहापौर दीपकसिंह रावत व सभागृह नेते महेश कदकदंडे यांनीही या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करून अशा प्रकारच्या सत्कार सोहळ्यामुळे या सत्कारमूर्ती




विद्यार्थ्यांचे मनोबल वाढण्यास मदत होणार असून हा कार्यक्रम त्यांच्या भावी कारकिर्दीस प्रेरणा देणारा ठरेल असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांनी केले तर सुत्रसंचलन संतोष देवराय यांनी केले. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहायक आयुक्त प्रशासन गुलाम मो.सादेक, कार्यालय अधीक्षक पदमाकर कावळे, कल्याण घंटेवाड, प्रधान धम्मपाल, शुभांगी चौधरी, श्रध्दा बुरसे, श्रीरंग पवळे यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत.

**यांचा झाला गौरव :** बारावीतील गुणवंत : विभोकर राजेश शिंदे (७७.८३%), क्षितीज बालाजी लंकवाडे (७६.१७%), अमित भरत मुंढे (७६.३३%), राहीन सदफ मोहम्मद इलियास (७६.००%). दहावीतील गुणवंत :- वेदांती रमेश यशवंतकर (९७.८०%), मोहम्मद रोशनोद्दीन मोहम्मद रईसोद्दीन (९३.४०%), अपूर्वा अजय डांगे (९२.४०%), स्वयम मालू कांबळे (९१.६०%), साक्षी पुंडलीक मस्के (९१.४०%), वेदिका रमेश यशवंतकर (९१.२०%), सृष्टी सुमीत दवणे (८९.८०%), श्रेयश तानाजी केंद्रे (८७.२०%), प्रज्वल माधवराव कदम (८७.००%), संकल्प गणपती सरपे (८६.००%), तृप्ती दिपक नागरे (८५.०६%), कांचन आकाश शिंगे (८४.००%), प्रितम राजू सोनकांबळे (८३.२०%), आदिती महेश आसने (८०.४०%), कार्तिकी पदमाकर कावळे (७८.६०%), अनुष्का दिपकसिंह कनोजिया (७८.४०%), समीक्षा सतीश महाबळे (७७.६०%), यश पुंडलिक मोरे (७५.२०%).

# पोलीस अंमलदारांना अधिकार प्रदान

**नांदेड (प्रतिनिधी)–** मातंग बांधवांच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती शनिवार, १ ऑगस्ट २०२६ रोजी मोठ्या उत्साहात नांदेड जिल्ह्यात दरवर्षीप्रमाणे साजरी करण्यात येते. त्यामुळे १ ऑगस्ट रोजी तसेच त्यानंतर २ ते ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत सुध्दा जिल्हयातील ग्रामिण भागात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मिरवणुका व इतर कार्यक्रमांचे आयोजन करुन साजरी करण्यात येत असते. त्याअनुषंगाने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये व जिल्ह्यात शांतता टिकून राहावी म्हणून पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा अधिनियम १९५१ प्रमाणे प्रदान झालेल्या अधिकारान्वे पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

३० जुलै २०२६ चे ००:०० वाजतापासून ते दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ चे २४:०० वाजेपर्यत नांदेड जिल्ह्यात सर्व पो.स्टे. स्वाधिन अधिकारी त्यांचे अधिनस्त अधिकारी व अंमलदार यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३६ मधील पोट कलम अ ते ई प्रमाणे पुढीलप्रमाणे लेखी किंवा तोंडी आदेश आपापले हद्दीत देण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे.

रस्त्यावरील व रस्त्यावरुन जाणाऱ्या मिरवणुकीतील किंवा जमावातील लोकांनी कोणत्या रितीने चालावे, कोणत्या रितीने वागावे ते फर्माविण्यासाठी, अशा कोणत्याही मिरवणुकांना कोणत्या मार्गाने आणि कोणत्या वेळी जावे किंवा जाऊ नये हे ठरविण्याबद्दल. सर्व मिरवणुकीच्या व जमावाच्या प्रसंगी व पूजेअर्चेच्या प्रार्थना स्थळांच्या सर्व जागेच्या आसपास पूजाअर्चनाच्या वेळी कोणताही रस्ता किंवा सार्वजनिक जागा येथे गर्दी होणार असेल किंवा अडथळे होण्याचा संभव असेल अशा सर्व बाबतीत अडथळा होण्याचा संबंध असेल अशा सर्व बाबतीत अडथळा होऊ न देण्याबाबत. सर्व रस्त्यावर किंवा रस्त्यामध्ये सर्व धक्क्यावर व धक्क्यामध्ये आणि सार्वजनिक स्नानाच्या, कपडे धुण्याच्या व उतरण्याच्या जागेमध्ये व इतर कर्कश वाद्य वाजविणे वगैरेचे नियमन करण्याबद्दल आणि त्यावर नियंत्रण ठेवण्याबाबत. महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३३, ३५ ते ४०, ४२, ४३, ४५ या अन्वये नमुद केलेल्या कोणत्याही हुकूमापेक्षा कमी दर्जाचे व त्या पुष्टी देणारे दुय्यम अधिका-यांना जबाबदारीवर हुकूम करण्याचा मार्गदर्शनपर आदेश देण्याबाबत. तसेच सार्वजनिक ठिकाणी अथवा सार्वजनिक करमणुकीचे ठिकाणी ध्वनीक्षेपण आवाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी सुचना देण्यासंबधी.

कोणीही सदरचा आदेश लागू असे पर्यंत नांदेड जिल्ह्यात जाहीर सभा, मोर्चे, निदर्शने, पदयात्रा इत्यादी कार्यक्रम संबंधित पोलीस फौजदार किंवा त्यांच्या वरिष्ठांकडून तारीख व वेळ, सभेची जागा मिरवणुकीचा व मोर्चाचा मार्ग व त्यात दिल्या जाणाऱ्या घोषणा पुर्व परवानगी शिवाय आयोजित करु नयेत, असे कळविले आहे.

# बरबडा परिसरात एक महिन्यापासून विजेचा लपंडाव चालूच

**बरबडा (प्रतिनिधी)–** नायगाव तालुक्यातील बरबडा परिसरात तब्बल एक महिन्यापासून वीज पुरवठा खंडित होत असल्यामुळे शेतकरी व व्यापारी यांच्या व्यवसायावर विपरीत परिणाम होत असून, सामान्य जनता ही विजेच्या या अनियमित-पणाला त्रासून गेली आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीला कोण जबाबदार, असा खडा सवाल विद्युत महामंडळाला विचारला जात आहे.

वीज पुरवठ्यातील व्यत्यय थांबवण्यासाठी मेंटेनेसचा दर्जा सुधारण्यावर भर देण्यात यावा, जीर्ण झालेले विजेचे खांब तत्काळ बदलावेत, जीवितास धोकादायक ठरणाऱ्या लोंबकळत असलेल्या तारांची तत्काळ दुरुस्ती करावी, बरबडा येथील गोविंद नगर या भागात रस्त्यामध्ये येणारे विद्युत खांब लवकरात लवकर बाजूला सारून होणारी जीवित हानी टाळावी, अशी मागणीसुद्धा करण्यात येत आहे. संबंधित विद्युत महामंडळ अधिकाऱ्यांनी या बाबीकडे जातीने लक्ष घालून विद्युत पुरवठा सुरळीत चालू करावा, अशी मागणी बरबडा परिसरातील जनतेतून केली जात आहे.




**नांदेड** –हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त नगरेश्वर प्राथमिक शाळेत शिवसेना पक्षनिरीक्षक गणेश पेन्सलवार यांच्यावतीने शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक सुनील दाचावार, महानगरप्रमुख प्रकाश मारावार, उपजिल्हाप्रमुख बालाजी कल्याणकर, विजय बगाटे, सचिन पाटील, खाजा भाई, अशोक पावडे, सौरभ देवकत्ते, मंदार जोशी, गौरव यादव, सनी परदेशी, मनीष झगडे, अक्षय यादव आदी उपस्थित होते. (छाया : करणसिंह बैस)

# स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त संत गोरोबा काका आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय बॅगांचे वाटप

**बिलोली (प्रतिनिधी)–** राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंती दिनानिमित्त संपूर्ण राज्यभरात 'जयंती सप्ताह' विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा होत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाचे नांदेड जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील शिंदे नागणीकर यांच्या वतीने सोमवार, दि. २७ जुलै रोजी कुंडलवाडी येथील संत गोरोबा काका निवासी आश्रम शाळेतील जवळपास १८० विद्यार्थ्यांना शालेय बॅगाचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले.



या विधायक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकल्याचे दिसून आले. सदर निवासी आश्रम शाळेत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि भटक्या विमुक्त प्रवर्गातील अनेक गरजू व होतकरू विद्यार्थी शिक्षणाचे धडे गिरवत आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला हातभार लावणारा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर म्हणाले की, शिक्षणा-पासून वंचित व उपेक्षित घटकांतील शालेय मुला-मुलीपर्यंत पोहोचून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांना मदत करणे हेच खऱ्या अर्थाने स्वर्गीय अजितदादांना अभिवादन ठरेल, अशी भावना आपल्या मार्गदर्शनातून व्यक्त करत बालाजी पाटील नागणीकर यांनी घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद असून, इतरांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले.

# नांदेड जिल्ह्यात १२२ रास्तभाव दुकानांच्या परवान्यांसाठी अर्ज भरण्यास मुदतवाढ

**नांदेड (प्रतिनिधी)–**राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील विविध कारणांमुळे रिक्त असलेल्या व पर्यायी व्यवस्थेत असलेल्या १२२ रास्तभाव दुकानांच्या जागांवर नवीन परवान्यांसाठी अर्ज भरण्याची मुदत बुधवार १२ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच प्राप्त अर्जांवर आक्षेप व हरकती नोंदविण्यासाठीही मुदत शुक्रवार, दि. ३१ जुलै २०२६ पर्यंत निश्चित करण्यात आली आहे.

शासन निर्णय ६ जुलै २०१७ व २ फेब्रुवारी २०२२ मधील तरतुदींनुसार विविध कारणांमुळे (परवाना रद्द होणे, राजीनामा, मृत्यू, वैद्यकीय रजा आदी) रिक्त झालेल्या आणि सध्या पर्यायी व्यवस्थेत सुरू असलेल्या १२२ रास्तभाव दुकानांसाठी नवीन परवाने मंजूर करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

या प्रक्रियेमध्ये अधिक पारदर्शकता राहावी व सर्व पात्र संस्थांना पुरेशी संधी मिळावी या कारणास्तव अर्ज करण्याकरिता पुढीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता राहावी आणि सर्व पात्र संस्थांना अर्ज करण्याची संधी मिळावी यासाठी नवीन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १२ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच सदर जाहिरातीबाबत प्राप्त अर्जांवर आक्षेप किंवा हरकती नोंदविण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ निश्चित करण्यात आली आहे.

इच्छुक पात्र स्थानिक संस्थांनी, ग्रामपंचायत, नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचतगट, नोंदणीकृत सहकारी संस्था, महिला बचत गट आदींनी संबंधित तहसीलदार कार्यालयाशी संपर्क साधून मुदतवाढीच्या कालावधीत अर्ज किंवा आक्षेप सादर करावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा किंवा आक्षेपांचा विचार केला जाणार नाही, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड यांनी केले आहे.

# एकजुटीने पतसंस्थेच्या उभारणीत सहभागी व्हा -धनंजय तांबेकर

## ब्राह्मण समाजाच्या आर्थिक स्वावलंबनाकडे भक्कम पाऊल; 'श्री भगवान परशुराम पतसंस्था' स्थापनेचा निर्धार

**नायगाव (प्रतिनिधी)–** ब्राह्मण समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी स्वतंत्र पतसंस्था ही काळाची गरज असून, समाजातील परस्पर विश्वास, आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि सामूहिक सहभागाच्या बळावरच अशी संस्था यशस्वी होऊ शकते. त्यामुळे वैयक्तिक मतभेद, अहंकार आणि गटबाजी विसरून समाजाने समर्पणाच्या भावनेने एकत्र येत पतसंस्थेच्या उभारणीत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन गोदावरी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक धनंजय तांबेकर यांनी केले.

ब्राह्मण समाजाच्या स्वतंत्र पतसंस्थेच्या स्थापनेसंदर्भात आयोजित बैठकीत ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत




होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुदखेडचे माजी नगराध्यक्ष रामराव चौधरी होते, तर सगरोळीचे प्रमोदराव देशमुख यांनी उद्घाटक म्हणून उपस्थिती लावली. यावेळी विश्वास देशमुख, विक्रम राजे, बालासाहेब पांडे, ॲड. महेश कनकदंडे, निखिल लातूरकर, ॲड. यदुपथ अर्धापूरकर, शांभवी साले यांच्यासह समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व भगवान परशुराम यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा शाल व 'दासबोध' ग्रंथ देऊन सन्मान करण्यात आला. प्रारंभीच समाजहिताच्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# ॲड. यदुपत अर्धापूरकर यांना 'डॉ. अण्णाभाऊ साठे गौरव पुरस्कार २०२६' जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)–** साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंती महोत्सवानिमित्त समाजातील उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यासाठी प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'डॉ. अण्णा भाऊ साठे गौरव पुरस्कार २०२६' यंदा नांदेड येथील ज्येष्ठ विधिज्ञ व सामाजिक कार्यकर्ते ॲड. यदुपत श्यामसुंदर अर्धापूरकर यांना जाहीर झाला आहे.



सामाजिक बांधिलकी, लोकहिताची भूमिका आणि विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत हा सन्मान त्यांना प्रदान करण्यात येत असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३.३५ वाजता नांदेड येथील साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे चौक येथे आयोजित करण्यात आला आहे.

या सोहळ्याचे आयोजन लहुजी साळवे युवक संघ, नांदेड आणि साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव समितीच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. समाजप्रबोधन, सामाजिक न्याय आणि लोककल्याणाच्या विचारांना प्रेरणा देणाऱ्या या पुरस्कार सोहळ्याला विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

# पीक विमा हप्ता व्यतिरिक्त अतिरिक्त शुल्क देऊ नका

## तालुका कृषी अधिकारी बिऱ्हाडे यांचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०२६ अंतर्गत पीक विमा अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू असून, शेतकऱ्यांनी पीक विम्याचा हप्ता वगळता कोणतेही अतिरिक्त शुल्क ग्राहक सेवा केंद्र (सीएससी) चालकांना देऊ नये, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी अर्धापूर श्री. बिऱ्हाडे यांनी केले आहे.

पीक विमा अर्ज भरण्याची सुविधा ग्राहक सेवा केंद्रामार्फत विनाशुल्क उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र, तालुक्यातील काही कॉमन सर्व्हिस सेंटर (सीएससी) चालकांकडून प्रत्येक अर्जामागे सुमारे १०० रुपये नियमबाह्य शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून प्राप्त होत आहेत. शासनाने विनामूल्य उपलब्ध करून दिलेल्या सुविधेसाठी अतिरिक्त रक्कम आकारणे अयोग्य असून, शेतकऱ्यांनी अशा कोणत्याही मागणीस बळी पडू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०२६ अंतर्गत पीक विमा अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ असून, त्यानंतर मुदतवाढ मिळणार नसल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच पीक विमा अर्ज भरण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य आहे.

यावर्षी जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी असून अनेक भागात समाधानकारक पावसाची आवश्यकता आहे. हवामान विभागाने पुढील काळातही कमी पावसाचा अंदाज व्यक्त केला असून, त्याचा परिणाम खरीप पिकांच्या उत्पादनावर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी अंतिम दिवसाची प्रतीक्षा न करता तातडीने पीक विमा योजनेत सहभागी होऊन आपल्या पिकांचे संरक्षण करावे, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी बिऱ्हाडे यांनी केले आहे.

# बारडमध्ये श्री साईबाबा मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याची जय्यत तयारी

## गुरुपौर्णिमेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम; काल्याचे कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन

**मुदखेड (प्रतिनिधी)–** मुदखेड तालुक्यातील बारड येथे ग्रामस्थांच्या लोकसहभाग, श्रमदान आणि लोकवर्गणीतून उभारण्यात आलेल्या श्री साईबाबा मंदिरात गुरुपौर्णिमेच्या पावन मुहूर्तावर श्री साईबाबा मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या भक्तिभावात पार पडणार आहे. या निमित्ताने तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, काल्याचे कीर्तन, भजन, पूजन, हवन आणि महाप्रसादाचा लाभ भाविकांना मिळणार आहे.

बारड ग्रामपंचायतीने साई मंदिर संस्थानसाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. सुमारे १०५ बाय ६० फूट क्षेत्रफळावर उभारण्यात आलेल्या या मंदिरात ३ बाय ३० फूट आकाराचा प्रशस्त गाभारा बांधण्यात आला असून त्यामध्ये पाच फूट उंचीची संगमरमरी श्री साईबाबांची मूर्ती प्रतिष्ठापित करण्यात येणार आहे. मंदिर परिसरात वृक्षारोपणासह आकर्षक बगीचाही विकसित करण्यात आला आहे. ग्रामस्थांच्या श्रमदान, लोकसहभाग आणि लोकवर्गणीतून शिर्डीच्या धर्तीवरील देखणे साई मंदिर साकार झाल्याने परिसरातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

गुरुपौर्णिमेनिमित्त बुधवार, दि. २९ जुलै रोजी सकाळी शुभमुहूर्तावर मंडळपूजन, हवन आणि सकाळी ९ वाजून ५ मिनिटांनी श्री साईबाबा मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी १०.३० ते १२.३० या वेळेत हरिभक्त परायण प्रेममूर्ती हर्षल महाराज थोरात पाटोदेकर (येवला) यांचे काल्याचे कीर्तन होणार असून, कार्यक्रमानंतर ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

या धार्मिक सोहळ्याची सुरुवात दि. २७ जुलै (सोमवार) रोजी सकाळी ९.१५ वाजता गावातील प्रमुख मार्गांवरून ग्रामप्रदक्षिणा व शोभायात्रेने होणार आहे. दि. २८ जुलै (मंगळवार) रोजी सकाळी ७ ते १० या वेळेत पूजा मांडणी होईल. त्यानंतर ११ ते सायंकाळी ५ या वेळेत मंडळस्थापना, पूजन, हवन तसेच मूर्तीस जलदिवास, फलदिवास, धान्यदिवास, फुलदिवास आणि शयन विधी आदी धार्मिक कार्यक्रम पार पडतील.

या पवित्र सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ग्रामस्थ तसेच श्री साईकृष्ण मंदिर संस्थान विश्वस्त व्यवस्था समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# बळीरामपूर येथील जय हनुमान गृहनिर्माण संस्थेवर कारवाईचे आदेश

## नोंदणी रद्द झाल्यानंतरही विक्री व्यवहार केल्याचा आरोप

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड तालुक्यातील बळीरामपूर येथील जयहनुमान मागासवर्गीय गृहनिर्माण सहकारी संस्थेची नोंदणी रद्द झाल्यानंतरही कन्व्हेन्स डीड विक्री व्यवहार केल्याचे दुय्यम निबंधक यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी संबंधित संस्थेच्या तोतया चेरमनवर कायदेशीर कारवाई करावी असे आदेश ग्रामीण पोलीस ठाण्यात दिले आहेत. या प्रकरणी आ. आनंदराव बोंढारकर यांनी अधिवेशनात तारांकीत प्रश्न उपस्थित केला होता, याची तत्काळ शासनाने दखल घेतली आहे.

बळीरामपूर एमआयडीसी भागातील जयहनुमान मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी तोतया बोगस चेअरमन बनवून विक्री करणे व खरेदी घेणे त्यामुळे प्लॉटधारक व शासनाची फसवणूक केल्यामुळे त्यांची सखोल चौकशी करून पोलिसात गुन्हा दाखल करावा. याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर, त्याचबरोबर उपनिबंधक सहकारी संस्थेचे अनिल चव्हाण यांनी ग्रामीण पोलीस ठाण्याला पत्र देऊन आदेशीत केले असून, संबंधित तोतया चेअरमनवर तत्काळ गुन्हे दाखल करावेत असे आदेश कढले आहेत. याप्रकरणी नांदेड दक्षिणचे आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांनी १९ जून रोजी संसदेत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता, याची शासनाने तात्काळ दाखल घेतली असून संबंधित संस्थेच्या चेअरमनवर कायदेशीर तात्काळ कारवाई करण्यात यावी, असे आदेश ग्रामीण पोलिसांना दिले आहेत.

# साहित्यिक रुचिरा बेटकर यांना 'डॉ. अण्णा भाऊ साठे गौरव पुरस्कार २०२६' जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)–** साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंती महोत्सवाचे औचित्य साधून सामाजिक, साहित्यिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्य कर्तृत्वाचा सन्मान करण्यासाठी नांदेड येथील साहित्यिक रुचिरा शेषराव बेटकर यांची 'डॉ. अण्णा भाऊ साठे गौरव पुरस्कार-२०२६' साठी निवड करण्यात आली आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन शनिवार, दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ०३:३५ वाजता साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे चौक, नांदेड येथे करण्यात आले आहे.



रूचिरा बेडकर यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

CMYK

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

# रात्री उशिरा जेवण्याची सवय ठरू शकते घातक!

## चयापचयापासून मूत्रपिंडांपर्यंत होऊ शकतो गंभीर परिणाम

**आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत अनेकजण रात्री उशिरापर्यंत काम करतात, तर तरुणांमध्ये मोबाईल स्क्रोलिंग, सोशल मीडिया किंवा ओटीटी पाहण्याची सवय वाढली आहे. परिणामी रात्रीचे जेवणही उशिरा होते. अधूनमधून उशिरा जेवल्याने फारसा त्रास होत नाही; मात्र ही सवय रोजची झाली, तर तिचा यकृत (लिव्हर), चयापचय (मेटाबॉलिझम) आणि मूत्रपिंडांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो.**



तज्ज्ञांच्या मते, रात्री उशिरा जेवल्यामुळे शरीराच्या जैविक घड्याळात (सर्केडियन रिदम) व्यत्यय येतो. त्यामुळे रक्तातील साखरेचे नियंत्रण, इन्सुलिनची कार्यक्षमता, चरबी साठवण्याची प्रक्रिया, झोपेची गुणवत्ता आणि दीर्घकाळात मूत्रपिंडांचे आरोग्य यावरही परिणाम होऊ शकतो. जरी केवळ उशिरा जेवणे हे मूत्रपिंडाच्या आजाराचे थेट कारण नसले, तरी लठ्ठपणा, मधुमेह आणि उच्च रक्तदाबाचा धोका वाढवून ते अप्रत्यक्षपणे मूत्रपिंडांना हानी पोहोचवू शकते.

### रात्री उशिरा जेवल्यावर काय घडते?

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ (NIH) च्या माहितीनुसार, आपल्या शरीरातील जवळपास प्रत्येक अवयव २४ तासांच्या जैविक घड्याळानुसार कार्य करतो. सकाळी आणि दिवसा शरीर अन्नाचे अधिक चांगल्या प्रकारे पचन करून त्याचे ऊर्जेत रूपांतर करते. मात्र रात्री होत गेल्यावर इन्सुलिनची संवेदनशीलता कमी होऊ लागते आणि चयापचयाचा वेगही मंदावतो. अशा वेळी जड किंवा भरपूर अन्न खाल्ल्यास शरीर ते प्रभावीपणे पचवू शकत नाही. त्यामुळे रक्तातील साखर जास्त काळ वाढलेली राहू शकते आणि अतिरिक्त कॅलरी चरबीच्या स्वरूपात शरीरात साठू लागतात.

### उशिरा रात्रीचे जेवण चयापचयावर कसा परिणाम करते?

» रक्तातील साखरेचे नियंत्रण बिघडू शकते : NIH च्या माहितीनुसार, दिवसा तुलनेत रात्री शरीराची ग्लुकोज नियंत्रित करण्याची क्षमता कमी असते. त्यामुळे उशिरा जेवण केल्यास रक्तातील साखरेची पातळी अधिक काळ वाढलेली राहू शकते. कालांतराने यामुळे इन्सुलिन रेझिस्टन्स आणि टाइप-२ मधुमेहाचा धोका वाढू शकतो. विशेषतः परिष्कृत कर्बोदके (रिफाइंड कार्बोहायड्रेट्स) आणि जास्त कॅलरीयुक्त आहार घेतल्यास हा धोका अधिक वाढतो.

» इन्सुलिनची कार्यक्षमता कमी होऊ शकते : नॅशनल सेंटर फॉर बायोटेक्नॉलॉजी इन्फॉर्मेशन (NCBI) च्या माहितीनुसार, रात्री मेलाटोनिन हार्मोनचे प्रमाण वाढू लागते, जे शरीराला झोपेसाठी तयार करते. याच काळात इन्सुलिनचा प्रभाव तुलनेने कमी होतो. अशा वेळी जड जेवण केल्यास रक्तातील साखर नियंत्रित करण्यासाठी शरीराला अधिक मेहनत घ्यावी लागते. ही सवय कायम राहिल्यास चयापचयाशी संबंधित समस्या उद्भवू शकतात.

### लठ्ठपणा, मधुमेह आणि उच्च रक्तदाबामुळे मूत्रपिंडांवर होणारा परिणाम

» लठ्ठपणामुळे मूत्रपिंडांवर अतिरिक्त ताण : रात्री उशिरा जास्त कॅलरीयुक्त अन्न खाल्ल्याने अतिरिक्त ऊर्जा शरीर चरबीच्या स्वरूपात साठवते. त्यामुळे वजन वाढणे आणि पोटावरील चरबी वाढण्याचा धोका निर्माण होतो. संशोधनानुसार लठ्ठपणामुळे मूत्रपिंडांवर अतिरिक्त ताण पडतो आणि दीर्घकाळात त्यांची कार्यक्षमता कमी होऊ शकते.

» मधुमेहामुळे मूत्रपिंडातील रक्तवाहिन्यांचे नुकसान : NCBI च्या माहितीनुसार, वारंवार उशिरा जेवण केल्याने रक्तातील साखरेचे नियंत्रण बिघडू शकते. कालांतराने इन्सुलिन रेझिस्टन्स वाढून टाइप-२ मधुमेह झाला, तर तो मूत्रपिंड निकामी होण्याच्या प्रमुख कारणांपैकी एक ठरू शकतो. अनियंत्रित रक्तातील साखर मूत्रपिंडातील सूक्ष्म रक्तवाहिन्यांचे नुकसान करते.

### आरोग्यासाठी काय करावे?

तज्ज्ञांच्या मते, रात्री उशिरा जेवणे हे मूत्रपिंडाच्या आजाराचे थेट कारण नसले, तरी ते शरीराच्या जैविक घड्याळावर परिणाम करते. त्यामुळे रक्तातील साखरेचे नियंत्रण, इन्सुलिनची कार्यक्षमता, चरबी साठण्याची प्रक्रिया आणि झोपेची गुणवत्ता यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. दीर्घकाळ ही सवय कायम राहिल्यास लठ्ठपणा, मधुमेह आणि उच्च रक्तदाबाचा धोका वाढून मूत्रपिंडाच्या आजारांची शक्यताही वाढते.

### वेळेवर जेवण हीच उत्तम सवय

वेळेवर, संतुलित आणि हलका रात्रीचा आहार हा केवळ वजन नियंत्रणासाठीच नव्हे, तर चयापचय, यकृत आणि मूत्रपिंडांच्या दीर्घकालीन आरोग्यासाठीही अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. रात्री उशिरा जेवण्याची सवय टाळल्यास अनेक गंभीर आजारांचा धोका कमी होऊ शकतो.

### या सवयी अंगीकारा

» शक्यतो रात्रीचे जेवण वेळेवर करा.
» झोपण्यापूर्वी किमान २ ते ३ तास आधी जेवण पूर्ण करा.
» रात्री हलका आणि संतुलित आहार घ्या.
» तेलकट, तळलेले आणि जास्त कॅलरीयुक्त पदार्थ टाळा.
» नियमित व्यायाम करा आणि वजन नियंत्रणात ठेवा.
» रक्तातील साखर, रक्तदाब आणि कोलेस्टेरॉलची नियमित तपासणी करा.



# 'कॉकरोच'ला अजिबात जवळ येऊ देऊ नका...



## तुमच्यासाठी आहेत घातक! मुले अन् ज्येष्ठ नागरिक लवकर बनतात शिकार

**कॉकरोच म्हणजे झुरळ हे निरुपद्रवी कीटक आहेत, असा समज अनेकांचा असतो. मात्र हा गैरसमज आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतो. माश्या, डास, उंदीर आणि वटवाघळांप्रमाणेच कॉकरोचही अनेक जंतू आणि रोगकारक जीवाणू पसरवू शकतात. विशेषतः अन्न दूषित करून ते फूड पॉइझनिंग आणि इतर संसर्गजन्य आजारांना कारणीभूत ठरू शकतात. तज्ज्ञांच्या मते, झुरळांमुळे होणाऱ्या संसर्गाचा सर्वाधिक धोका लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि कमी प्रतिकारशक्ती असलेल्या व्यक्तींना असतो. त्यामुळे घरात झुरळे दिसल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता तातडीने त्यांचा बंदोबस्त करण्याची गरज आहे.**

### कसे ओळखाल कॉकरोच?

» अंडाकृती (ओव्हल) आकाराचे शरीर.
» सहा पाय.
» लांब स्पर्शेंद्रिये (अँटेना).
» चपटे आणि जमिनीला लागून असलेले शरीर
» अतिशय वेगाने धावण्याची क्षमता.
» पंख असणे.

### कॉकरोच आरोग्यासाठी धोकादायक का आहेत?

आरोग्यतज्ज्ञांच्या माहितीनुसार, झुरळांच्या शरीरात अनेक प्रकारचे जीवाणू आढळू शकतात. त्यामध्ये साल्मोनेला (Salmonella), स्टॅफिलोकोकस (Staphylococcus) आणि स्ट्रेप्टोकोकस (Streptococcus) यांसारख्या जीवाणूंचा समावेश होतो. काही संशोधनांनुसार ते काही विषाणूंचे वहनही करू शकतात. जगभरात झुरळांच्या सुमारे ४,००० प्रजाती आढळतात. त्यापैकी सुमारे ३० प्रजाती मानवी वस्त्यांमध्ये किंवा त्यांच्या आसपास आढळतात. त्यामुळे घरातील स्वच्छता राखणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.



### मुलं आणि ज्येष्ठांना अधिक धोका का?

संशोधनानुसार, अन्नातून पसरणाऱ्या आजारांमुळे दरवर्षी जगभरात कोट्यवधी लोक आजारी पडतात. लहान मुलांची आणि ज्येष्ठांची रोगप्रतिकारक शक्ती तुलनेने कमी असल्यामुळे त्यांना संसर्ग लवकर होण्याची शक्यता असते. त्यामुळे त्यांच्यामध्ये जुलाब, उलट्या, ताप, पोटदुखी, शरीरातील पाण्याची कमतरता (डिहायड्रेशन), गंभीर संसर्ग अशा समस्या अधिक गंभीर स्वरूपात दिसू शकतात.

### झुरळांपासून बचाव कसा कराल?

» घराची दर आठवड्याला सखोल स्वच्छता करा.
» स्वयंपाकघर आणि अन्न तयार करण्याची जागा नेहमी स्वच्छ ठेवा.
» फ्रिज, गॅस, टोस्टर आणि इतर उपकरणांच्या खाली नियमित साफसफाई करा.
» कचऱ्याचा डबा रोज रिकामा करून स्वच्छ ठेवा.
» पाळीव प्राण्यांच्या भांड्यात अन्न रात्रभर ठेवू नका.
» घरातील नळ किंवा पाण्याच्या टाक्यांमधून गळती होऊ देऊ नका.
» अन्नपदार्थ झाकून ठेवा आणि हवाबंद डब्यांमध्ये साठवा.
» गरज भासल्यास व्यावसायिक पेस्ट कंट्रोल करून घ्या.

### आजार कसे पसरवतात?

कॉकरोच माश्यांप्रमाणेच अन्न, कचरा, सडलेले पदार्थ आणि मलमूत्र अशा विविध ठिकाणी फिरतात. या प्रक्रियेत त्यांच्या शरीरावर आणि पचनसंस्थेत अनेक हानिकारक जीवाणू जमा होतात. हे जीवाणू त्यांच्या विष्ठेद्वारे किंवा उलटीद्वारे अन्नपदार्थांवर पोहोचतात. दूषित अन्न सेवन केल्यास फूड पॉइझनिंग, पोटाचे संसर्ग आणि इतर आजार होण्याचा धोका वाढतो.


### पावसाळ्यात सावध राहा

पावसाळ्यात कॉकरोच, डास, माश्या आणि उंदीर यांचा वावर वाढतो. या काळात अन्न दूषित होण्याचा आणि संसर्गजन्य आजार पसरण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे घर आणि परिसर स्वच्छ ठेवणे, साचलेले पाणी टाळणे आणि स्वच्छतेचे नियम पाळणे अत्यंत आवश्यक आहे.

# वारंवार धाप लागते, छातीत दुखते? दुर्लक्ष करू नका; हे CKM सिंड्रोमचे असू शकतात संकेत

**थोडे चालले किंवा जिना चढला तरी धाप लागणे, छातीत दुखणे, पायांना सूज येणे किंवा पटकन थकवा जाणवणे ही लक्षणे अनेकजण हृदय किंवा फुफ्फुसांच्या आजाराशी जोडतात. मात्र तज्ज्ञांच्या मते ही लक्षणे कार्डिओव्हॅस्क्युलर-किडनी-मेटाबॉलिक (CKM) सिंड्रोमचीही असू शकतात. या अवस्थेत हृदय, मूत्रपिंड आणि शरीरातील चयापचयाशी (मेटाबॉलिझम) संबंधित समस्या, जसे की लठ्ठपणा, मधुमेह आणि उच्च रक्तदाब या एकमेकांशी घट्टपणे जोडलेल्या असतात. यापैकी एखाद्या अवयवाची कार्यक्षमता बिघडल्यास त्याचा परिणाम इतर अवयवांवरही होऊ शकतो.**

बदलती जीवनशैली, अयोग्य आहार आणि कमी झालेली शारीरिक हालचाल यामुळे आज मधुमेह, लठ्ठपणा आणि उच्च रक्तदाबाच्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. अनेकजण या समस्या स्वतंत्र आजार मानतात. मात्र नव्या संशोधनानुसार या सर्व समस्या परस्परांशी संबंधित आहेत. याच संबंधांचे स्पष्टीकरण देण्यासाठी अमेरिकन हार्ट असोसिएशनने कार्डिओव्हॅस्क्युलर-किडनी-मेटाबॉलिक (CKM) सिंड्रोम ही संकल्पना मांडली आहे. भविष्यात हृदयविकार, मूत्रपिंडाचे आजार आणि चयापचयाशी संबंधित गंभीर समस्या उद्‌भवण्याचा धोका असलेल्या व्यक्तींची वेळेत ओळख करणे हा यामागील उद्देश आहे.



### मधुमेह, लठ्ठपणा अन् उच्च रक्तदाबाशी याचा संबंध काय?

» नॅशनल किडनी फाउंडेशनच्या मते, CKM सिंड्रोमची मुळे प्रामुख्याने चयापचयाशी संबंधित धोकादायक घटकांमध्ये असतात.
» लठ्ठपणा : विशेषतः पोटाभोवती साचलेली चरबी (व्हिसरल फॅट) शरीरातील दाह वाढवते आणि इन्सुलिन रेझिस्टन्सला चालना देते.
» मधुमेह : दीर्घकाळ रक्तातील साखरेचे प्रमाण जास्त राहिल्यास मूत्रपिंडातील सूक्ष्म रक्तवाहिन्या आणि हृदय दोन्हींचे नुकसान होऊ शकते.
» उच्च रक्तदाब : सतत वाढलेला रक्तदाब हृदयाला अधिक मेहनत करण्यास भाग पाडतो आणि हळूहळू मूत्रपिंडांची कार्यक्षमताही कमी करतो.
» असामान्य कोलेस्टेरॉल : एलडीएल (वाईट) कोलेस्टेरॉल वाढल्यास धमन्यांमध्ये प्लाक साचतो. त्यामुळे हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोका वाढतो.

### CKM सिंड्रोम टाळता येऊ शकतो का?

तज्ज्ञ आणि अमेरिकन हार्ट असोसिएशनच्या मते, होय. जोखीम वाढवणाऱ्या घटकांवर वेळेत नियंत्रण मिळविल्यास या सिंड्रोमचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करता येतो. यासाठी वजन नियंत्रित ठेवा, आठवड्याला किमान १५० मिनिटे व्यायाम करा, मीठ आणि प्रक्रिया केलेले (प्रोसेस्ड) अन्न कमी खा, फळे, भाज्या, कडधान्ये आणि संपूर्ण धान्यांचा आहारात समावेश वाढवा, धूम्रपान व तंबाखूजन्य पदार्थांपासून दूर राहा, मद्यपान मर्यादित ठेवा, रक्तदाब, रक्तातील साखर आणि कोलेस्टेरॉलची नियमित तपासणी करा, डॉक्टरांनी दिलेली औषधे नियमितपणे घ्या.

### CKM सिंड्रोम म्हणजे नेमके काय?

अमेरिकन हार्ट असोसिएशनच्या मते, CKM सिंड्रोम हा एखादा स्वतंत्र आजार नसून अशी अवस्था आहे, ज्यामध्ये हृदय, मूत्रपिंड आणि शरीराची चयापचय प्रणाली (लठ्ठपणा, मधुमेह, इन्सुलिन रेझिस्टन्स, उच्च रक्तदाब आणि असामान्य कोलेस्टेरॉल) एकमेकांवर परिणाम करत असतात.


### हे चक्र असे कार्य करते...

» लठ्ठपणामुळे इन्सुलिन रेझिस्टन्स वाढू शकतो.
» इन्सुलिन रेझिस्टन्समुळे मधुमेहाचा धोका वाढतो.
» मधुमेहामुळे मूत्रपिंडांचे नुकसान होऊ शकते.
» मूत्रपिंडाच्या आजारामुळे उच्च रक्तदाब वाढू शकतो.
» उच्च रक्तदाब आणि मूत्रपिंडाच्या समस्या मिळून हृदयावर अतिरिक्त ताण निर्माण करतात. म्हणजेच, एका समस्येमुळे दुसरी समस्या अधिक गंभीर होत जाण्याचे हे दुष्टचक्र आहे.

### ही लक्षणे आढळल्यास सावध व्हा

» थोड्याशा श्रमाने धाप लागणे.
» छातीत वेदना किंवा दडपण जाणवणे.
» पटकन थकवा येणे.
» पाय किंवा घोट्यांवर सूज येणे.
» रात्री श्वास घेण्यास त्रास होणे.
» शरीरात द्रव साचल्यामुळे अचानक वजन वाढणे.
» हृदयाचे ठोके वेगाने किंवा अनियमित होणे
» ही लक्षणे हार्ट फेल्युअर, कोरोनरी आर्टरी डिसीज किंवा मूत्रपिंडाच्या आजारांशी संबंधित असू शकतात. त्यामुळे त्याकडे सामान्य थकवा म्हणून दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते.

### वेळेवर निदान महत्त्वाचे...



कार्डिओव्हॅस्क्युलर-किडनी- मेटाबॉलिक (CKM) सिंड्रोम ही संकल्पना हृदय, मूत्रपिंड आणि चयापचयाशी संबंधित आरोग्य एकमेकांशी किती जवळून जोडलेले आहे, हे स्पष्ट करते. धाप लागणे किंवा छातीत दुखणे ही केवळ हृदयविकाराचीच नव्हे तर CKM सिंड्रोमचीही सुरुवातीची लक्षणे असू शकतात. मधुमेह, लठ्ठपणा, उच्च रक्तदाब किंवा मूत्रपिंडाचा आजार असल्यास नियमित आरोग्य तपासणी, संतुलित जीवनशैली आणि वेळेवर उपचार यामुळे गंभीर गुंतागुंत टाळता येऊ शकते. वेळेवर निदान आणि योग्य व्यवस्थापन हाच CKM सिंड्रोमपासून बचावाचा सर्वात प्रभावी मार्ग आहे.

# विद्यार्थी आंदोलकांवरील लाठीमाराची चौकशी करण्यास सुप्रीम कोर्टाची परवानगी; महाराष्ट्रासह ७ राज्यांना नोटीस

**नवीदिल्ली (प्रतिनिधी)**–नीट पेपरफुटी प्रकरणी दिल्लीच्या जंतर मंतर येथे कॉकरोच जनता पार्टी आणि विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनावेळी २० जुलैला पोलिसांनी बेछूट लाठीमार केला होता. संसद भवनाच्या दिशेने निघालेल्या आणि जंतर मंतरवरील विद्यार्थ्यांवर पोलिसांनी अमानुषपणे लाठीमार करुन अनेकांची डोकी फोडली होती, काहींना जखमी केले होते. यानंतर दिल्ली पोलिसांनी जंतर मंतरवरील आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्याचा आणि त्यांना अटक करण्याचा सपाटा लावला होता. या पार्श्वभूमीवर दिल्लीतील कॉक्रोच आंदोलनावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणीला मंगळवारी सुरुवात झाली. यावेळी सरन्यायाशीध सूर्यकांत यांनी दिल्ली पोलिसांकडून करण्यात आलेल्या लाठीमाराची गंभीर दखल घेत महत्त्वाचे आदेश दिले. दिल्ली पोलिसांच्या लाठीमाराची चौकशी करण्याला आणि जबाबदारी निश्चित करण्याला न्यायालयाने परवानगी दिली आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रासह सात राज्यांना नोटीस पाठवून नीट आंदोलनातील विद्यार्थ्यांच्या FIR वर पोलिसांनी तपास सुरू ठेवावा, पण दंडात्मक कारवाई नको, असे निर्देश दिले आहेत. तसेच ज्यांचे जुने क्रिमिनल रेकॉर्ड नाहीत त्यांना अटकेत ठेवू नये, अशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रासह सात राज्यांना नोटीस जारी केली आहे. त्यानुसार, नीट आंदोलनातील विद्यार्थ्यांच्या ऋखठ वर पोलिसांनी तपास सुरू ठेवावा पण दंडात्मक कारवाई नको, असे निर्देश देण्यात आले आहेत. ज्यांचे जुने क्रिमिनल रेकॉर्ड नाहीत त्यांना अटकेत ठेवू नये. सीसीटीव्ही, कॅमेरा रेकॉर्डिंग , वायरलेस कम्युनिकेशन रेकॉर्ड, इलेक्ट्रॉनिक रेकॉर्ड सुरक्षित ठेवावेत. लोक, विद्यार्थ्यांची खासगी माहिती सार्वजनिक केली जाऊ नये, असे न्यायालयाकडून सांगण्यात आले आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी सोमवारी होणार आहे.

# दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस विलिनीकरणाच्या चर्चा शरद पवार यांनी फेटाळल्या

**मुंबई(प्रतिनिधी)**–गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात सातत्याने चर्चेचा विषय ठरत असलेल्या दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाबाबत आता खुद्द शरद पवार यांनीच भाष्य केले आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याचा संबंधच नाही, असे शरद पवार यांनी म्हटले. ते मंगळवारी बारामती येथे प्रसार–माध्यमांशी बोलत होते. शरद पवार यांनी हे वक्तव्य करुन राजकीय वर्तुळाला पुन्हा एका संभ्रमात टाकले आहे. काही दिवसांपूर्वीच दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाला सुनेत्रा पवार यांचा विरोध असल्याची कुजबुज समोर आली होती. त्यानंतर आता शरद पवार यांनीही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची शक्यता थेटपणे उडवून लावल्याने दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटात नेमकं काय सुरु आहे, याबाबतचा संभ्रम आणखीनच वाढला आहे.

काही दिवसांपूर्वीच दिल्लीत पार्थ पवार आणि प्रफुल पटेल यांनी शरद पवार यांची भेट घेतल्याची माहिती नुकतीच समोर आली होती. दिल्लीत जंतर मंतर येथे दिल्ली पोलिसांनी २० जुलैला आंदोलकांवर लाठीमार केला होता. त्याच्या दुसऱ्या दिवशी शरद पवार आणि सुप्रिया सुळे पंतप्रधान मोदी यांना संसदेत भेटले होते. यावेळी शरद पवार आणि पंतप्रधान मोदी यांच्यात तब्बल अर्धा तास चर्चा झाली होती. यानंतर दुसऱ्याच दिवशी पार्थ पवार आणि प्रफुल पटेल हे शरद पवार यांना भेटायला गेल्याची माहिती आहे. तसेच अलीकडेच अजितदादा गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनीही अमित शाह यांची भेट घेतली होती. गेल्या काही दिवसांपासून शरद पवारांची राष्ट्रवादी एनडीएसोबत सत्तेत सामील होणार, अशी जोरदार चर्चा आहे. मात्र, भाजप नेतृत्त्वाने शरद पवार यांनी राष्ट्रवादीत विलीन होऊनच एनडीएसोबत यावे, अशी घट घातली होती. यामुळे पार्थ पवार व प्रफुल पटेलांनी शरद पवारांची भेट घेतल्याने राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या प्रक्रियेला वेग आल्याची अटकळ बांधली जात होती. मात्र, शरद पवार यांनी आज बारामतीत दिलेल्या प्रतिक्रियेने या चर्चेत फारसे तथ्य नसल्याचे दिसून येत आहे.

# जि. प., पं. स. आणि ग्रामपंचायतीमध्ये विजयी उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ

**मुंबई (प्रतिनिधी)**– स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना दिलासा देणारा निर्णय मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना आता निवडून आल्याचे घोषित झाल्यापासून १२ महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असणार आहे.

या निर्णयानुसार, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी किंवा त्यानंतर पार पडलेल्या ग्रामपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक अथवा पोटनिवडणुकीत निवडून आलेल्या सदस्यांना हा नियम लागू राहील. निर्धारित १२ महिन्यांच्या मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधित लोकप्रतिनिधीची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द मानली जाईल आणि तो सदस्य, सरपंच, जिल्हा परिषद अध्यक्ष किंवा पंचायत समिती सभापती म्हणून पदावर राहण्यास अपात्र ठरेल. यासाठी 'महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९' आणि 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१' मध्ये आवश्यक सुधारणा केल्या जाणार आहेत.

राज्यात एनडीपीएस कायद्यानुसार सुमारे ३० हजार खटले प्रलंबित आहेत. यापैकी एकट्या पुण्यात १ हजार ४२५ खटले प्रलंबित असल्याने, उच्च न्यायालयाच्या शिफारशीनुसार पुण्यात विशेष न्यायालय स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या न्यायालयासाठी जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीशांसह ८ पदे मंजूर करण्यात आली असून १ कोटी २६ लाख रुपयांच्या खर्चाला मान्यता देण्यात आली आहे. पुणे जिल्हा न्यायालयातील कक्ष क्रमांक २२ या न्यायालयासाठी उपलब्ध करून दिला जाणार आहे.


रुग्ण सेवा मंडळ देगलूर संचलित

## दाभड आरोग्य केंद्र

ता. अर्धापूर जिल्हा नांदेड

### वैद्यकीय अधिकारी नियुक्त करणे

**रुग्ण सेवा मंडळ देगलूर संचालित दाभड आरोग्य केंद्र दाभड ता. अर्धापूर येथे संस्थेचे आरोग्य केंद्र कार्यान्वित आहे.**

**प्रस्तुत केंद्रामध्ये गरीब व गरजू रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी करण्यासाठी MBBS/ BMS डॉक्टर (वैद्यकीय अधिकारी) नियुक्ती करावयाचे आहे.**

**सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून आरोग्य सेवा करण्यास इच्छुक असलेल्या डॉक्टरानी दिनांक ११ ऑगस्ट २०२६ रोजी ठीक १२.०० वाजता आवश्यक कागदपत्रासह मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.**

**स्थळ – रुग्ण सेवा मंडळ संचलित**

**दाभड आरोग्य केंद्र, दाभड ता. अर्धापूर, जि. नांदेड**


तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी बिलोली
तालुका बिलोली यांचे कार्यालय
प्रगटन: जन्म नोंद घेणे बाबत.
अर्ज/आवक क्रं.२०६७/२०२६

## जाहीर प्रगटन

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की अर्जदार इनामदार मिर्झा वसीम बेग बाबू पाशु बेग,वय ४० धंदा – व्यवसाय रा.बिलोली ता. बिलोली यांनी या कार्यालयात हजर राहून जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ आणि कलम ११(२) व (३) अन्वये दि.०३/०७/२०२६ रोजी जन्म नोंद आदेश घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार इनामदार मिर्झा वसीम बेग बाबू पाशु बेग रा. बिलोली ता. बिलोली यांचा जन्म दि. ०७/०६/१९८६ रोजीची नोंद मुख्याधिकारी नगर परिषद बिलोली ता. बिलोली जि. नांदेड येथे उपलब्ध नाही.

ज्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की अर्जदार इनामदार मिर्झा वसीम बेग बाबू पाशु बेग, यांच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाले पासून पंधरा दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिलामार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहित कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

आज दि. ०६/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**बिलोली**

# ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मणराव जोशी यांचे निधन



**नागपूर (प्रतिनिधी)**–नागपूर 'तरुण भारत'चे माजी मुख्य संपादक ल. त्र्यं. लक्ष्मणराव जोशी यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोक व्यक्त केला आहे. पत्रकारितेतील चिंतनशील, व्रतस्थ व्यक्तिमत्त्व आणि विविध विषयांचे गाढे अभ्यासक हरपल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे की, राजकारण आणि सिंचन अनुशेष हे लक्ष्मणराव जोशी यांच्या विशेष अभ्यासाचे विषय होते. पत्रकार म्हणून एखादा प्रकल्प दत्तक घेऊन त्यावर सातत्याने लेखन करण्याची परंपरा त्यांनी रुजवली. गोसीखुर्द प्रकल्पावर त्यांनी केलेले विपुल लेखन त्याचे उत्तम उदाहरण असल्याचे त्यांनी नमूद केले.

लक्ष्मणराव जोशी यांनी 'तरुण भारत'मध्ये प्रदीर्घ काळ सेवा बजावत मुख्य संपादक म्हणून काम पाहिले. निवृत्तीनंतरही त्यांनी गोवा आणि इतर ठिकाणच्या विविध वृत्तपत्रांमध्ये संपादक म्हणून कार्य केले.


## टी. सी. हरवली आहे

माझी इसरार अहेमद शेख सत्तार या नावाची जिल्हा परिषद हायस्कूल बिलोली येथील इयत्ता एस एस सी अनूत्तिर्णची टी. सी. बिलोली ते नांदेड प्रवासात हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा. **संपर्क**–इसरार अहेमद शेख सत्तार रा. बिलोली, ता. बिलोली जि.नांदेड मो.– ९७६३३८४६३३

## Change In Name

MY OLD NAME IS **MEENAKSHI MALLIKARJUN NIRNE** WHICH NOW I AM CHANGING AS NEW NAME **MINAKSHI KASHINATH HATTE** HENCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER NEW NAME.PLEASE CONSIDER THE SAME. **Adress-** BASWESHWAR NAGAR, Old KAUTHA Beside Mahadev Mandir Nanded-431603 Mo. No. 7755988529


## जाहीर प्रगटन

मा.तहसीलदार अर्धापूर तथा तालुका दंडाधिकारी
अर्धापूर यांचे न्यायालयात
अर्ज क्र. ०२/२०२६

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार विलास तुकाराम गजभारे रा. मेंढला खु. ता. अर्धापूर यांनी त्यांची आई मयत नामे लक्ष्मीबाई तुकाराम गजभारे यांच्या मृत्यु नोंद आदेशासाठी या कार्यालयात जन्म / मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ (२) व (३) अन्वये अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार यांची आई लक्ष्मीबाई तुकाराम गजभारे हीचा दि. २८/०१/२०२२ रोजीची मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मेंढला खु. ता. अर्धापूर जिल्हा नांदेड येथे उपलब्ध नाही, असे ग्रामपंचायत अधिकारी यांनी दिनांक ०३/०१/२०२६ रोजीच्या प्रमाणपत्रान्वये कळविले आहे.

त्याअर्थी या जाहिरप्रगटनाव्दारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, वरील लक्ष्मीबाई तुकाराम गजभारे यांच्या मृत्यु नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी या जाहिर प्रगटनापासून १५ दिवसात या कार्यालयास आपला आक्षेप नोंदवावा. दिलेल्या तारखेपर्यंत आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

आज दिनांक ०७/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात येत आहे.

**तहसीलदार, अर्धापूर**

## जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व येते की, आमचे पक्षकार रोहीत पि. माळे रा. फ्लॅट डी ७००३ श्रीजी विहार सोसायटी, पिंपळे सौदागर, पुणे यांनी दिलेल्या माहिती अधिकारावरून हे जाहीर प्रगटण देण्यात येते की, आमच्या पक्षकाराने सदाशीय पि. व्यंकटराव मुंड रा. पिंपळगाव, ता. जि. नांदेड व अनिल पि. वसंतराव पाटील रा. नरहर नगर, नांदेड ता. जि. नांदेड यांच्याकडून त्यांच्या मालकी व ताब्यातील ग्रामपंचायत कोंढा मौजे कोंढा ता. अर्धापुर जि. नांदेड पैकी मोजे, कोंढा येथील शेत गट नंबर ३७३ आहे. शेत नामे वाघमारी आहे. क्षेत्रफळ ४ हेकटर ८२ आर आकार १७ रु १४ पैसे, पैकी त्यांच्या हिस्स्याचे १ हेक्टर ०० आर जिरायतीचे शेत आमचे पक्षकारास कायमचे विक्री करण्याचा सौदा केला आहे. ज्याची चतु: सिमा, पूर्वेस :– सरकारी पांदण आहे पश्चिमेस :– सीताराम नागोजी व सखाराम नागोजी यांची जमीन आहे दक्षिणेस :– अनिल पाटील व रविशंकर नेरनाळे यांची जमीन आहे उत्तरेस :– बाबुराव कदम यांची जमीन आहे येणे प्रमाणे चतुर्सिमेच्या आतील मिळकत विकत घेण्याचा/हस्तांतर करण्याचा सौदा/करार केला आहे व करारापोटी ईसारा रक्कम पण दिली आहे. तरी सर्व जनतेस व संबंधीतांना या जाहीर प्रगटणाद्वारे सुचित करण्यात येते की, कोणास सदरील मिळकतीबाबत किंवा सदरील व्यवहाराबाबत काहीही आक्षेप असल्यास त्यांनी आपला लेखी आक्षेप संबंधीत कागदपत्रासह हे जाहीर प्रगटण प्रसिद्ध झाल्या तारखेपासून ७ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर नोंदवावा. मुदतीत कोणाचे काही आक्षेप न आल्यास आमचे पक्षकार सदरील मिळकतीचा चा व्यवहार पुर्ण करून रितसर खरेदीखत /हस्तांतरण करून घेतील व मुदतीनंतर आलेले आक्षेप आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाहीत. करीता हे जाहीर प्रगटन.

मार्फत
ॲड. प्रितीश हणमंतराव टेंकाळे
ऑफिस: व्यंकटेश्वरा नगर,
रिंग रोड, नांदेड
मो. ९०२८३३२१३४

जाहीर प्रगटन देणार:
राम गणपतराव मंगनाळे
रा. भावसार चौक
शास्त्रीनगर, नांदेड


## 1BHK Flat किरायाने देणे आहे

प्रशस्त, सर्व सोयीने युक्त, पाण्याची २४ तास उपलब्धता. सुमित्रा पेट्रोल पंपाच्या अगदी जवळ, राम मंदिराच्या बाजूला, **1BHK** फ्लॅट किरायाने देणे आहे. **पत्ता–** राम सेतू पुलाजवळ विजय नगर शिक्षक कॉलनी, जुना कौठा, नांदेड–४३१६०३

**Contact number**
9403854442, 8208778403

## टी. सी. हरवली आहे

माझी रेणुका भगवान लष्करे या नावाची इयत्ता दहावी पासची टी. सी. पिंपळकौठा ते मुदखेड दरम्यान बस प्रवासात हरवली आहे. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया सापडल्यास पुढील पत्त्यावर कळवावे. **संपर्क पत्ता–** रा. पिंपळकौठा पो. दरेगाव, ता. मुदखेड, जि. नांदेड


## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री नारायण जयराम हरणे रा. बिलोली, ता. बिलोली जि. नांदेड यांनी मौ. बिलोली, ता. बिलोली जि. नांदेड येथील सर्वे नं. २६१/ब/२ पैकी क्षेत्र ०१ हे. ८२ आर या जमिनीचे हैद्राबाद ईनाम निर्मूलन व रोख अनुदाने कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषक प्रयोजनासाठी झालेले हस्तांतरण नियमीत करून भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे. तेंव्हा मौ. बिलोली जि. नांदेड येथील सर्वे नं. २६१/ब/२ पैकी क्षेत्र ०१ हे ८२ आर या जमिनीचे हैद्राबाद ईनाम निर्मुलने व रोख अनुदाने कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषक प्रयोजनासाठी झालेले हस्तांतरण नियमीत करू न भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असत्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार दत्ता जयराम हरणे रा. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड यांनी मौ. बिलोली, जि. नांदेड येथील सर्वे नं. २६१/ब/२ पैकी क्षेत्र ०१ हे ८२ आर या जमिनीचे हैद्राबाद ईनाम निर्मूलन व रोख अनुदाने कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषक प्रयोजनासाठी झालेले हस्तांतरण नियमीत करून भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ. बिलोली जि. नांदेड येथील सर्वे नं. २६१/ब/२ पैकी क्षेत्र ०१ हे ८२ आर या जमिनीचे हैद्राबाद ईनाम निर्मुलने व रोख अनुदाने कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषक प्रयोजनासाठी झालेले हस्तांतरण नियमीत करू न भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असत्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**

## जाहीर प्रगटन
### (जन्म नोंद आदेशासाठी)

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, शिवाजी परसराम शिंदे रा. माळकौठा ता. मुदखेड जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचे मुलीचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे. जन्म झालेल्याचे नाव श्रीयांशी संभाजी रा. माळकौठा ता. मुदखेड जि. नांदेड या सदर व्यक्तीचा उमरेकर मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल, डॉक्टर लेन कलामंदीर समोर नांदेड ता. जि. नांदेड ठिकाणी दिनांक १७.०८.२०२४ या दिवशी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेकरीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक ०४.०५.२०२६ रोजी तहसिल कार्यालय नांदेड येथे अर्ज पुराव्यासह सादर केला आहे.

वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक २५.०५.२०२६
स्थळ –
नांदेड

तहसीलदार नांदेड तथा तालुका दंडाधिकारी
नांदेड करिता

## जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व येते की, आमचे पक्षकार रोहीत पि. रामराव मंगनाळे रा. फ्लॅट डी ७०३ श्रीजी विहार सोसायटी, पिंपळे सौदागर, पुणे यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येते की, आमच्या पक्षकाराने सदाशिव पि. व्यंकटराव पुंड रा. पिंपळगाव, ता. जि. नांदेड व अनिल पि. वसंतराव पाटील रा. नरहर नगर, नांदेड ता. जि. नांदेड यांच्याकडून त्यांच्या मालकी व ताब्यातील ग्रामपंचायत कोंढा मौजे कोंढा ता. अर्धापुर जि. नांदेड पैकी मौजे कोंढा येथील शेत गट नंबर ३७३ आहे. शेत नामे (वाघमारी) आहे. क्षेत्रफळ ४ हेक्टर ८२ आर आकार १७ रु १४ पैसे, पैकी त्यांच्या हिस्स्याचे १ हेक्टर ०० आर जिरायतीचे शेत आमचे पक्षकारास कायमचे विक्री करण्याचा सौदा केला आहे.

ज्याची चतु: सिमा, पूर्वेस : सरकारी पांदण आहे, पश्चिमेस :– सीताराम नागोजी व सखाराम नागोजी यांची जमीन आहे, दक्षिणेस –अनिल पाटील व रविशंकर नेरनाळे यांची जमीन आहे उत्तरेस– बाबुराव कदम यांची जमीन आहे. येणे प्रमाणे चतुर्सिमच्या आतील मिळकत विकत घेण्याचा/हस्तांतर करण्याचा सौदा/करार केला आहे व करारापोटी ईसारा रक्कम पण दिली आहे. तरी सर्व जनतेस व संबंधीतांना या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, कोणास सदरील मिळकतीबाबत किंवा सदरील व्यवहाराबाबत काहीही आक्षेप असल्यास त्यांनी आपला लेखी आक्षेप संबंधीत कागदपत्रासह हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्या तारखेपासून ७ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर नोंदवावा. मुदतीत कोणाचे काही आक्षेप न आल्यास आमचे पक्षकार सदरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण करून रितसर खरेदीखत/हस्तांतरण करून घेतील व मुदतीनंतर आलेले आक्षेप आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाहीत. करीता हे जाहीर प्रगटन.

जाहीर प्रगटन देणार
रोहीत पि. रामराव मंगनाळे
रा. फ्लॅट डी ७०३,
श्रीजी विहार सोसायटी,
पिंपळे सौदागर, पुणे.

मार्फत
ॲड. प्रितीश हणमंतराव टेकाळे
ऑफिस: व्यंकटेश्वरा नगर,
रींग रोड, नांदेड.
मो. ९०२८३३२१३४

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्रीमती गंगाबाई दिगंबर हरणे रा. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड यांनी मौ. बिलोली, जि. नांदेड येथील सर्वे नं. २६१/ब/१ पैकी क्षेत्र ०१ हे. ८२ आर या जमिनीचे हैद्राबाद ईनाम निर्मूलन व रोख अनुदाने कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषक प्रयोजनासाठी झालेले हस्तांतरण नियमीत करून भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ. बिलोली जि. नांदेड येथील सर्वे नं. २६१/ब/१ पैकी क्षेत्र ०१ हे ८२ आर या जमिनीचे हैद्राबाद ईनाम निर्मुलने व रोख अनुदाने कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषक प्रयोजनासाठी झालेले हस्तांतरण नियमीत करू न भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असत्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्रीमती कलावतीबाई गंगाधर हरणे रा. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड यांनी मौ. बिलोली, जि. नांदेड येथील सर्वे नं. २६१/ब/१ पैकी क्षेत्र. ०१ हे. ८२ आर या जमिनीचे हैद्राबाद ईनाम निर्मूलन व रोख अनुदाने कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषक प्रयोजनासाठी झालेले हस्तांतरण नियमीत करून भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ. बिलोली जि. नांदेड येथील सर्वे नं. २६१/ब/१ पैकी क्षेत्र ०१ हे ८२ आर या जमिनीचे हैद्राबाद ईनाम निर्मूलन व रोख अनुदाने कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषक प्रयोजनासाठी झालेले हस्तांतरण नियमीत करू न भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असत्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.


**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**


## टी. सी. हरवली आहे

माझी सचिन लक्ष्मण बिसमिले या नावाची इयत्ता अकरावी पासची टी. सी. तरोडा नाका ते श्रीनगर दरम्यान ऑटो प्रवासात हरवली आहे. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया सापडल्यास पुढील पत्त्यावर कळवावे. **संपर्क पत्ता–** सचिन लक्ष्मण बिसमिले मु. बोंढार, पो. नेरली, ता. जि. नांदेड मो. ९५५२४८५५२६

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचा नांदेडमधील तक्रारदारांशी 'संवाद'



**नांदेड (प्रतिनिधी)–** नागरिकांच्या तक्रारी समजून घेऊन, त्यांचा जलद निपटारा करणे व पोलीस -नागरिक यांच्यातील संवाद वाढवून लोकाभिमुख कामकाजाद्वारे जनतेचा पोलिसांवरील विश्वास दृढ करणे, या उद्देशाने पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत 'जनसंवाद' उपक्रम सुरू केला आहे.

परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांच्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक हे प्रत्येक महिन्यास जिल्हा मुख्यालयांना भेटी देत असतात. यादरम्यान, त्या त्या जिल्ह्यातील तक्रारदारांना प्रत्यक्ष भेटून, त्यांच्या तक्रारी व अडीअडचणी समजून घेऊन, त्या तत्परतेने सोडवण्याचा पोलीस उपमहानिरीक्षक यांचा प्रयत्न आहे.

मंगळवार, दि. २८ जुलै रोजी, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पोलीस अधीक्षक, नांदेड कार्यालयात जिल्हा पोलिसांच्या काम-काजाचा मासिक आढावा घेतल्यानंतर दुपारी ३ ते ५ या वेळेत जिल्ह्यातील तक्रारदारांशी 'संवाद' साधला. यादरम्यान, एकूण १७ तक्रारदारांनी आपले लिखित अर्ज पोलीस उपमहानिरीक्षक यांना सोपविले. यात, मालमत्ताविषयक वाद, हरवलेले इसम, मारहाणी बाबत, दाखल गुन्ह्यांचा तपास इत्यादी तक्रारींचा समावेश आहे.

सदर दिवशी प्राप्त तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन त्यांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तक्रारदारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी, पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने यापूर्वीच 'संवेदना' ही तक्रार निवारण प्रणाली सुरू केली आहे. आज रोजी 'जनसंवाद' उपक्रमादरम्यान, प्राप्त झालेले सर्व अर्ज 'संवेदना' पोर्टलच्या माध्यमातून पुढील चौकशी व कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येणार असून, प्रत्येक तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीचा आढावा नांदेड परिक्षेत्र कार्यालयातील फीडबॅक टीममार्फत घेण्यात येणार आहे.

याप्रसंगी, पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, नांदेड जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, आर्थिक गुन्हे शाखा व शहरातील पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी हे हजर होते.

# धर्माबाद येथे युरिया खताची बेकायदेशीर वाहतूक उधळली; टेम्पोसह ९ लाखांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** शेतकऱ्यांसाठी शासनामार्फत अनुदानित दराने उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या युरिया खताची बेकायदेशीररीत्या परराज्यात वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कृषी विभागाच्या जिल्हा भरारी पथकाने धडक कारवाई करत टेम्पोसह ९ लाख ४० हजार ३१५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी धर्माबाद पोलीस ठाण्यात संबंधितांविरुद्ध विविध कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हा भरारी पथक प्रमुख तथा मोहीम अधिकारी सचिन कपाळे व जिल्हा भरारी पथक सचिव अमोल पेकम यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार शेतकऱ्यांसाठी राखीव असलेला अनुदानित युरिया खताचा मोठा साठा विनापरवाना व बेकायदेशीर मार्गाने तेलंगणा राज्याच्या दिशेने वाहतूक केला जात असल्याची माहिती प्राप्त झाली होती. या माहितीच्या आधारे जिल्हा भरारी पथकाने कृषी अधिकारी (गुण नियंत्रण, धर्माबाद यांच्या सहकार्याने सापळा रचून संशयित टेम्पो अडवून तपासणी केली.

तपासणीदरम्यान टेम्पोमध्ये कोणतेही वैध परवाने अथवा आवश्यक कागदपत्रांशिवाय शासकीय अनुदानित युरिया खताची पोती आढळून आली. त्यानंतर कृषी विभागाने तत्काळ कारवाई करत संपूर्ण खतसाठा व वाहतुकीसाठी वापरण्यात आलेला टेम्पो जप्त केला. जप्त करण्यात आलेल्या खतसाठा व वाहनाची एकूण किंमत ९ लाख ४० हजार ३१५ असून सदर मुद्देमाल पुढील कायदेशीर कारवाईसाठी धर्माबाद पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे.

याप्रकरणी कृषी विभागाचे गुण नियंत्रण निरीक्षक विशाल चंदापुरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून धर्माबाद पोलीस ठाण्यात खत नियंत्रण आदेश, १९८५, अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ तसेच भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दोन वर्षांपूर्वी केलेल्या खड्ड्यांत झाडे कधी लावणार?

## ज्येष्ठ कवी, लेखक श्रीकांत देशमुख यांचा सवाल

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड महानगरपालिकेने शहरातील काबरा नगर, छत्रपती चौक, सिडको, व्हीआयपी रोड आदी परिसरात वृक्षारोपणासाठी दीड ते दोन फूट उंचीचे पाईप बसवले होते. मात्र, या कामाला आता जवळपास दोन वर्षे उलटूनही त्या ठिकाणी झाडे लावण्यात आलेली नाहीत. अनेक पाईप फुटले असून, काहींचा वापर नागरिक कचरा टाकण्यासाठी करत आहेत. काही ठिकाणी मात्र जागरूक नागरिकांनी स्वतः माती भरून झाडे लावण्याचा प्रयत्न केला आहे.

याबाबत ज्येष्ठ कवी व लेखक श्रीकांत देशमुख यांनी मनपा आयुक्तांशी दूरध्वनीवर संपर्क साधला असता, संबंधित काम सार्वजनिक बांधकाम विभागाचे असल्याचे सांगण्यात आले. यावर मग महानगरपालिकेची जबाबदारी नेमकी काय? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

शहरातील स्वच्छता व्यवस्थेवरही श्रीकांत देशमुख यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. कचरा व्यवस्थापनाचे योग्य नियोजन नसल्याने अनेक ठिकाणी अस्वच्छता पसरली आहे. तसेच फुटपाथवर रात्री उघडपणे मद्यपान करणाऱ्यांचा त्रास वाढला असून, महिलांना व नागरिकांना यामुळे गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

दोन वर्षांपूर्वी मोर चौक परिसरात स्वतःवर हल्ला झाल्याचा अनुभव सांगताना, पोलिसांनी गुन्ह्याची नोंद घेण्याऐवजी पुरावा मागितल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

शेवटी श्रीकांत देशमुख यांनी महानगरपालिका प्रशासनाला आवाहन करत, झाडे लावण्याचा कोणताही विचार नसल्यास उरलेले पाईप तत्काळ हटवावेत, जेणेकरून त्यांचा गैरवापर थांबेल, अशी मागणी केली. तसेच शहरात प्लास्टिकबंदीची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे आणि सार्वजनिक ठिकाणी नियमबाह्य पद्धतीने बॅनर लावले जात असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले. या सर्व बाबींची मनपा प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

# वाजेगावच्या माजी सरपंचाची पुन्हा प्रशासकीय पदाची मागणी; ग्रामस्थांचा विरोध, पुरावे सुरक्षित राहतील का?

## अपहाराच्या गुन्ह्यात आरोपी असलेल्या माजी सरपंचाला पुन्हा पद? वाजेगावात नव्या वादाला तोंड

**नांदेड (प्रतिनिधी)–** तालुक्यातील वाजेगाव ग्रामपंचायतीतील कथित शासकीय निधी अपहार प्रकरणात गुन्हा दाखल असलेले माजी सरपंच जमील अहमद अमीर हमजा यांनी पुन्हा प्रशासकीय सरपंच म्हणून नियुक्ती करण्याची मागणी शासनाकडे केली आहे. त्यामुळे गावात नव्या चर्चेला तोंड फुटले आहे.

उपलब्ध माहितीनुसार, संबंधित माजी सरपंचांनी १३ जुलै रोजी जिल्हा परिषद प्रशासनाकडे अर्ज केला आहे. त्यात स्वतःवर दाखल गुन्हा न्यायप्रविष्ट असून जामीन मंजूर झाला आहे, त्यामुळे प्रशासकीय सरपंच म्हणून नियुक्ती द्यावी, अशी विनंती करण्यात आली आहे. या अर्जानंतर जिल्हा परिषद स्तरावर पत्रव्यवहार सुरू झाल्याची माहिती आहे.

याच ग्रामपंचायतीतील कथित शासकीय निधी अपहार प्रकरणात संबंधित माजी सरपंच, तत्कालीन ग्रामसेवक व इतरांविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या कलम ४०९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ व १२०(ब) अन्वये गुन्हा दाखल आहे. प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट असून तपास व न्यायालयीन प्रक्रिया सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर ग्रामस्थ व तक्रारदारांनी आक्षेप नोंदवला आहे. प्रशासकीय सरपंच म्हणून पुन्हा पदभार दिल्यास ग्रामपंचायतीच्या नोंदी, कागदपत्रे व पुराव्यांवर प्रभाव टाकण्याची किंवा त्यांच्याशी छेडछाड होण्याची शक्यता नाकारता येत नाही अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत संबंधित व्यक्तीची नियुक्ती टाळावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तक्रारदार लतीफखान पठाण यांनीही जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देऊन, गुन्हा न्यायप्रविष्ट असताना संबंधित व्यक्तीला प्रशासकीय सरपंचपद देणे योग्य नाही असा दावा केला आहे.

जिल्हा परिषद प्रशासनाने संबंधित अर्जावर अद्याप अंतिम निर्णय जाहीर केलेला नाही. ग्रामपंचायतीचा कार्यकाळ संपल्यानंतर शासनाने अस्तित्वातील कार्यकारिणीच्या खांद्यावर तात्पुरत्या स्वरूपात प्रशासकीय जबाबदारी दिली होती. अशा स्थितीत भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या व्यक्तीला पद दिल्यास राज्यात चुकीचा पायंडा पडेल, अशी चर्चा होत आहे.

# बलात्काराच्या गुन्ह्यातील आरोपीला १० वर्षे शिक्षा व १० हजार दंड

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अल्पवयीन मुलीवर अत्याचाराच्या गुन्ह्यात तदर्थ सत्र न्यायाधीश चौधरी यांनी मंगळवार, दि. २८ जुलै रोजी आरोपीला १० वर्षे सश्रम कारावास आणि १० हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास अतिरिक्त कारावास भोगावा लागेल, असेही न्यायालयाने आदेशात स्पष्ट केले आहे. गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी न्यायालयीन कोठडीत (कारागृहात) आहे.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात एका अल्पवयीन बालिकेवर अत्याचार झाल्याप्रकरणी गु.र.नं. ४६१/२०२२ कलम भा.दं.वि. कलम ३७६ (२) (ङ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच नांदेड ग्रामीण पोलिसांनी आरोपीला अटक करून तपासांती न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले होते. त्याचा सेशन केस क्र. २०२/२०२२ आहे. तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक श्रीमती कांबळे यांनी केला होता.

न्यायालयाने उपलब्ध पुरावे व सरकार पक्षाच्या वतीने ॲड. मनीकुमारी बत्तूला यांचा युक्तिवाद विचारात घेऊन आरोपीला दोषी ठरवले. त्यानुसार १० वर्षे सश्रम कारावास तसेच १० हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावण्यात आली. दंड नाही भरल्यास पुन्हा अतिरक्त शिक्षा भोगावी लागेल असेही आदेशात नमूद केले आहे.

# विद्यार्थ्यांनी नवीन क्षेत्रात भविष्य घडवावे -नरेंद्र चव्हाण



**नांदेड (प्रतिनिधी)–** दहावी, बरावी उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थी डॉक्टर किंवा इंजीनिअर होण्यासाठी प्रयत्न करतात. पण असंख्य असे क्षेत्र आहेत ज्या क्षेत्रात भविष्य घडवता येतो आणि पैसाही कमावता येतो. म्हणून विद्यार्थ्यांनी नवीन क्षेत्रात आपलं करिअर शोधण्याचा प्रयत्न करावा, असे प्रतिपादन भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आणि उद्योजक नरेन्द्र चव्हाण यांनी केले. ते सिख वेलफेअर असोसिएशन नांदेड तर्फे आयोजित सत्कार कार्यक्रमात बोलत होते.

या कार्यक्रमात सिख समाजाच्या ८० वर्षे पूर्ण वरिष्ठ नागरिक, गुणवंत विद्यार्थी आणि सिख नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सरदार लड्डूसिंघ महाजन होते. या वेळी आशीर्वाद देण्यासाठी गुरुद्वारा तखत सचखंड श्री हजुरसाहिब येथील सहायक जत्थेदार संतबाबा रामसिंघ, गुरुद्वारा श्री लंगर साहिबचे मुखी संतबाबा बलविंदरसिंघ कारसेवावाले यांची उपस्थिती होती. तर मंचावर नगरसेवक संदीपसिंघ गाडीवाले, नगरसेविका सौ. मनप्रीतकौर अमरजीतसिंघ कुंजीवाले, पोलीस कर्मचारी व खेळाडू चंद्रकांत पुलकुन्टवार, संस्थेचे उपाध्यक्ष सरदार इन्दरजीतसिंघ संधू यांची उपस्थिती होती.

यावेळी वरिष्ठ नागरिक गुरमुखसिंघ सुखमनी ड्रायवर, नारायणसिंघ केहरसिंघ बाबरे, खेमसिंघ खुशालसिंघ जत्थेदार, गोरखसिंघ उदयसिंघ लिखारी, लड्डूसिंघ महाजन यांचा वरिष्ठ नागरिक म्हणून सम्मान करण्यात आले. तसेच दहावी आणि बरावी बोर्ड परीक्षेत मेरिटपासून ते ६०% गुण अर्जित करणाऱ्या गुणवंत विद्यार्थियांचा भेट वस्तू आणि सिरेपाव देऊन सत्कार करण्यात आले. प्रस्ताविक लड्डूसिंघ महाजन यांनी केले तर सूत्रसंचालन रविंद्रसिंघ मोदी यांनी केले. शेवटी उपस्थितांचे आभार गुरुबचनसिंघ सिलेंदार यांनी मानले.

# पोलीस पाटील विठ्ठलराव देशमुख तरोडेकर यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** तरोडा बु. येथील ज्येष्ठ नागरिक तथा पोलीस पाटील विठ्ठलराव तुकाराम देशमुख तरोडेकर (८६) यांचे सोमवार, दि. २७ जुलै २०२६ रोजी सकाळी ७ वाजता तरोडा बु. येथील राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी दुपारी तरोडा बु. येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. विठ्ठलराव देशमुख यांनी १२ वर्षे ग्रामसेवक तर ६० वर्षे तरोडा बु. गावातील पोलीस पाटील म्हणून सेवा केली. त्यांच्या पश्चात १ मुलगा, ३ मुली, नातू, पणतू असा परिवार आहे.

# श्रीमती रजीकला दमकोंडवार यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील विवेकनगरमधील रहिवासी श्रीमती रजीकला दत्तात्रय दमकोंडवार (८५) यांचे वृद्धापकाळाने दि. २८ जुलै रोजी पहाटे राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गोवर्धनघाट येथील शांतीधाम स्मशानभूमीत सायंकाळी ५ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात ३ मुले, सुना, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# जिल्हा बँकेत विजय; बी.आर. कदम यांचा सत्कार



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा बँकेच्या निवडणुकीत माजी मुख्यमंत्री, खा. अशोकराव चव्हाण यांच्या सुक्ष्म नियोजनामुळे अर्धापूर तालुक्यातून भाजपाचे बी. आर.कदम हे मोठ्या फरकाने निवडून आले आहेत.

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत २३ जागांपैकी ११ जागा बिनविरोध आल्या होत्या. उर्वरित १२ जागेसाठी २६ उमेदवार रिंगणात होते. अर्धापूर तालुक्यातून बी. आर. कदम व ज्ञानेश्वर राजेगोरे यांच्यात अटीतटीची निवडणूक होईल असे चित्र रंगले होते. सोसायटी मतदारसंघात ३५ मतदारांपैकी ३५ जणांनी मतदान केल्याने शंभर टक्के मतदान झाले. तर संस्था मतदारसंघातून ६ पैकी ६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. यापैकी भाजपाचे बी. आर. कदम यांना ३० मते मिळाली तर त्यांचे प्रतिस्पर्धी ज्ञानेश्वर राजेगोरे यांना केवळ ४ मते मिळाली. १ मतदान बाद झाले.

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे नवनिर्वाचित संचालक बी. आर. कदम यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गोविंदराव नागेलीकर, भाजप जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, माजी सभापती किशोर स्वामी, सभापती संजय देशमुख लहानकर, तालुकाध्यक्ष बालाजी पाटील गव्हाणे, कृऊबा संचालक तथा जिल्हाध्यक्ष निळकंठराव मदने, प्रदेश प्रतिनिधी डॉ.लक्ष्मण इंगोले, नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, माजी उपनगराध्यक्ष राजेश्वर शेटे, बाळू पाटील धुमाळ, सोशल मीडिया तालुकाध्यक्ष गुरुराज रणखांब, बालाजी कदम, परमेश्वर बंडाळे, उमेश सरोदे, दत्ता नवले, भाजयुमोचे अजय देशमुख, सुरज माडे, तालुका उपाध्यक्ष कोंडीबा सूर्यवंशी, दिलीप डाहाळे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# मुसळे जिल्ह्यात सर्वाधिक मते घेऊन तर दिवशीकर सेवा सहकारी मतदारसंघातून विजयी; विजयाचा भोकरमध्ये जल्लोष



**भोकर (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत खा. अशोकराव चव्हाण आणि आ. श्रीजया चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली रामचंद्र मुसळे हे राखीव मतदारसंघातून जिल्ह्यात सर्वाधिक १०६८ मते घेऊन विजयी झाले तर राजू जाधव दिवशीकर सेवा सहकारी मतदारसंघातून ४७ मते घेऊन विजयी झाले. दोघेही संचालक म्हणून प्रचंड मतांनी विजयी झाल्याने मंगळवारी भोकरमध्ये भाजपाच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांच्या आतीषबाजीत जल्लोश साजरा केला.

रामचंद्र विठ्ठलराव मुसळे हे भोकर तालुक्यातील थेरबन येथील रहिवाशी असून, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत राखीव मतदारसंघातून ते जिल्ह्यात सर्वाधिक १०६८ मते घेऊन विजयी झाले. तर राजू गंगाधर जाधव दिवशीकर हे दिवशी येथील रहिवाशी असून, सेवा सहकारी मतदारसंघातून ४७ मते घेवून प्रचंड मतांनी विजयी झाले. मुसळे आणि दिवशीकर यांच्या विजयाचा भोकर येथील डॉ. आंबेडकर चौकात भाजपाच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांच्या आतीषबाजीत, ढोलताशाच्या गजरात पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला. यावेळी सभापती जगदीश पाटील भोसीकर, नगराध्यक्ष भगवानराव दंडवे, उपसभापती बालाजी शानमवाड , उपनगराध्यक्ष दिलीप सोनवाडे ,किशोर पाटील लगळुदकर, विशाल माने, बाबुराव सायाळकर, दिलीप देशमुख सोमठाणकर, विठ्ठल पाटील धोंडगे, माधव आमृतवाड, योगेश भोकरकर, वेणू कोंडलवार, डॉ. मनोज गिमेकर, गणेश यशवंतकर, डॉ. फेरोज इनामदार, सुवेश पोकलवार, डॉ. अशोक माझळकर, श्रीकांत दरबस्तवार, संतोष मारकवार, व्यंकटेश आसावा, डॉ. बाबुराव मलदोडे, गंपू पाटील नांदेकर, बाबुराव गोपतवाड, सिधेश्वर पिटलेवाड, आकाश गेंटेवार, ऋषीकेश स्वामी, अमोल शहागंटवार, वैजनाथ क्षीरसागर, गोविंद मेटकर, योगेश इज्जतगावकर, शैलेश सूर्यवंशी आदींसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# कै. डॉ. शंकरराव चव्हाण जयंतीनिमित्त 'यशवंत'मध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारताचे माजी केंद्रीय गृहमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित यशवंत महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने बुधवार, दि. २९ जुलै रोजी सकाळी दहा वाजल्यापासून रक्तदान शिबीर संपेपर्यंत यशवंत महाविद्यालयातील ॲम्पिथिएटर या ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयातील रक्तपेढीचे सहकार्य लाभणार आहे.

या शिबिरात जास्तीत-जास्त रक्तदात्यांनी रक्तदान करावे, असे आवाहन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी प्र- कुलगुरू तथा विद्यमान प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे, बीटीओ डॉ. प्रांजल नरवाडे, डॉ. धनश्री केंद्रे, समाजसेवा अधीक्षक सुनीत आवटे, कुणाल महागडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. साईनाथ बिंदगे, डॉ. रत्नमाला म्हस्के, डॉ. शिवाजी सूर्यवंशी, एनसीसी लेफ्टनंट प्रा. श्रीकांत सोमठाणकर, प्रा. प्रियांका सिसोदिया, प्रसिद्धी समन्वयक डॉ.अजय गव्हाणे, प्रबंधक संदीप पाटील, अधीक्षक कालिदास बिरादार व गजानन पाटील, जगन्नाथ महामुने आदींनी केले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com